cmyk

## संपादकीय

### पालकमंत्रीपद अन् महायुतीत महाधुसफूस!

नाशिक आणि रायगड जिल्हा पालकमंत्रिपद रद्द करण्याची नामुष्की सरकारवर आणि मुख्यमंत्र्यांवर ओढवणे ही गंभीर बाब आहे. महायुतीला विधानसभा निवडणुकीत राक्षसी बहुमत मिळाले, त्यामुळे महायुतीतील तिन्ही पक्षांच्या नेत्यांच्या आणि आमदारांच्या महत्त्वाकांक्षांनी सुद्धा राक्षसी रूप धारण केल्याचे स्पष्ट दिसते आहे. आधी मंत्रिमंडळ विस्तार, नंतर खातेवाटप आणि आता पालकमंत्रिपदावरून ही बाब अधिकच स्पष्ट झाली आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

D.S.Nagargoje 8908165555 9175606738
A.S.Nagargoje 9284872700 8007003550
बालाजी बॅटरी हाऊस
सेल्स अ‍ॅण्ड सर्व्हीसेस
आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.
पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२७१ | बुधवार, दि.२२ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांचे शासनाकडे सर्व डिटेल्स, तरीही बोगसगिरी

## रोहित पवारांचा सवाल, संगनमत असल्याशिवाय पिक विम्यात हे शक्य होईल का?

**पुणे । प्रतिनिधी**

**शासनाकडे शेतकऱ्यांचे आधार कार्ड, ७/१२ उतारे यांचे सर्व डिटेल्स असताना बोगस अर्ज का ओळखता येऊ शकत नाहीत? असा सवाल आ. रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. तसेच संगनमत असल्याशिवाय हे शक्य कसे होऊ शकते, असेही ते म्हणाले. याबाबत त्यांनी समाज माध्यमावर पोस्ट टाकली आहे.**




राज्यात एक रुपयात पीक विमा योजना बंद करण्यात यावी अशी शिफारस कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. ◀◀ पान २ वर

### नेमकं काय म्हणाले रोहित पवार?

बोगस अर्जांमुळे तसेच गैरव्यवहारांमुळे 'एक रुपयात पीकविमा योजना' बंद करण्याचा विचार करणे म्हणजे 'उन्हात पाय भाजतात म्हणून पायात चप्पल घालण्याऐवजी संपूर्ण पृथ्वीवर चामडे अंथरण्यासारखे आहे'. त्यामुळे काही ठराविक लोकांच्या चुकीमुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दंड देणे योग्य होणार नाही. मुळात आज तंत्रज्ञान एवढे प्रगत असताना बोगस अर्ज येतातच कसे? ज्याप्रमाणे समाज माध्यमावर एका स्क्रीनचे सबस्क्रीप्षण असेल तर दुसऱ्या स्क्रीनवर ते करताच येत नाही तर मग त्याचप्रमाणे शासनाकडे शेतकऱ्यांचे आधार कार्ड, ७/१२ उतारे यांचे सर्व डिटेल्स असताना बोगस अर्ज का ओळखता येऊ शकत नाहीत? पीकविमा कंपन्या, कृषी विभागाचे अधिकारी यांच्या संगनमताशिवाय बोगस अर्ज दाखल होऊच शकत नाही. त्यामुळे या योजनेसंदर्भात निर्णय घेताना एकांगी विचार न करता व्यापक, चोहोबाजुनी विचार करूनच शासनाने निर्णय घ्यावा, ही विनंती, रोहित पवार यांनी म्हटले आहे

# अमित शहा महाराष्ट्र दौऱ्यावर येणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा २४ जानेवारी रोजी मुंबईला येत आहेत. ते गोरेगाव, मुंबई येथील नेस्को येथे सहकारी बँका आणि पतसंस्थांसाठी आव्हाने आणि भविष्याचा मार्ग या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. केंद्रीय सहकार मंत्रालय, महाराष्ट्र सहकार विभाग आणि एनयूसीएफडीसी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र दौऱ्यादरम्यान शहा नाशिकमधील त्र्यंबक येथील त्र्यंबकेश्वर मंदिरालाही भेट देऊ शकतात.

# खंडणी मागितली त्या दिवशीचे सीसीटिव्ही फुटेज उघड

## वाल्मिक कराडच्या अडचणीत वाढ; पोलिस अधिकारी पाटीलही दिसले







**बीड । प्रतिनिधी**

**खंडणी प्रकरणातील एक सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. अवादा कंपनीकडे खंडणीची मागणी करण्यात आली होती. त्या दिवशीचे हे फुटेज असल्याची माहिती समोर आली आहे. या व्हायरल होणाऱ्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये वाल्मिक कराड यांच्यासह सर्व आरोपी दिसत असून पोलिस अधिकारी पाटील सुध्दा यात दिसत आहेत. या फुटेजमुळे वाल्मिक कराड यांच्या अडचणीत वाढ होणार असल्याचे दिसते.**

बीडच्या खंडणी प्रकरणातील हा नवीन सीसीटीव्ही व्हिडीओ असल्याची माहिती आहे. दरम्यान, अवादा कंपनीकडे खंडणी मागितली त्या दिवसाचा हा व्हिडीओ असल्याचे बोलले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ज्या दिवशी खंडणी मागण्यात आली त्या दिवशी म्हणजे २९ नोव्हेंबर २०२४ चे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. हे फुटेज विष्णू चाटेच्या कार्यालयाच्या शेजारी असलेल्या एका दुकानातील फुटेज आहे. यात वाल्मिक कराड दिसत आहे. त्यासोबतच विष्णू चाटे पाहायला मिळत आहे. सुदर्शन घुले, कृष्णा ◀◀ पान २ वर

### सीसीटिव्ही फुटेजमध्ये नेमके कोण?

संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींचा नवा सीसीटीव्ही समोर आला आहे. विष्णू चाटेच्या कार्यालयातील २९ नोव्हेंबरला झालेल्या बैठकीचा हा सीसीटीव्ही असल्याची माहिती आहे. याच दिवशी आवादा कंपनीकडे खंडणी मागण्यात आली होती. सीसीटीव्हीमध्ये विष्णू चाटे, वाल्मिक कराड, सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, बालाजी तांदळे, प्रतीक घुले हे सर्वच आरोपी दिसत आहेत. निलंबित पोलीस अधिकारी पाटीलही या सीसीटीव्हीत दिसत आहे.

### सीसीटिव्ही फुटेजनंतर मनोज जरांगे आक्रमक



अवादा कंपनीच्या अधिकाऱ्याला धमकी दिल्यानंतर संतोष देशमुख खून प्रकरणातील मोक्का लागलेले सर्व आरोपी एकाच फ्रेममध्ये दिसले. या सीसीटिव्हीने खळबळ उडाली आहे. तर दुसरीकडे मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर तोफ डागली आहे. यावेळी जरांगे यांनी धनंजय मुंडेवर जहरी टीका करण्यात आली. सीसीटीव्हीमधील सर्व आरोपी पाहून खरंच धक्कादायक आणि चीड येणार आहे. राज्याने अशा गुंडगिरीचा आणि हप्ते वसुलीच्या टोळ्या या अगोदर बघितल्या होत्या. काय वाईट बघायची वेळ या धनंजय मुंडेंच्या टोळीने आणली आहे, असा घणाघात त्यांनी घातला. आजचा व्हिडिओ तर खूप धक्कादायक आहे. एका जागेवर बसून खंडणी मागायचा आणि खून करायचा जर कट शिजवण्यात येतो. एक मंत्री संघटित गुन्हेगारीला पाठबळ देतो. खंडणी मागणारे आणि आरोपी हे एकच असल्याचे जरांगे म्हणाले.

### पंकजा मुंडेंचा संबंध नाही

धनंजय मुंडे यांची टोळी डुप्लिकेट काम करत आहे. आरोपीच्या बाजूने मोर्चे काढत आहेत. आरोपीचे पाठ राखण करत आहेत. मग जातीतीवाद कोण करतंय, असा सवाल त्यांनी विचारला. आमच्यातही आरोपी असतील पण आता नवीन पायंडा पडत आहे. धनंजय मुंडे यांची टोळी आरोपीच्या बाजूने उभे राहत आहे, असा आरोप त्यांनी केला. संतोष देशमुख प्रकरणात पंकजा मुंडे यांचा या काहीही इंटरफेअर नाही, असे ते म्हणाले.

### वाल्मिक कराडला आज कोर्टात हजर करणार

वाल्मिक कराड याच्यावर दाखल असलेल्या मकोका खटल्याप्रकरणी दि. २२ जानेवारी रोजी बीड न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्यामुळे त्यास न्यायालयात हजर केले जाणार आहे. सात दिवसाची एसआयटी कोठडी संपल्यामुळे बीड न्यायालयात हजर केले जाणार आहे. ही सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे होण्याची शक्यता आहे. तर वाल्मिक कराडला न्यायालयीन कोठडी मिळणार की पुन्हा एसआयटी कोठडी याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आ. सुरेश धस यांचा नवा गौप्यस्फोट

#### महादेव मुंडेला भोसकून खल्लास केले, आकाच्या मुलाचे घेतले नाव

बीड : एकीकडे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हे प्रकरण ताजे असताना आता आमदार सुरेश धस यांनी महादेव मुंडे हत्या प्रकरण समोर आणले आहे. महादेव मुंडे हा इसम मुळचे कन्हेरवाडीचा होता. त्याची २२ ऑक्टोबर २०२३ रोजी हत्या करण्यात आली होती. त्यांची परळी वैजनाथच्या तहसीलसमोर चाकुने भोसकून हत्या करण्यात आली होती. याच प्रकरणात सुरेश धस यांनी नव्याने अनेक गौप्यस्फोट केले असून पहिल्यांदाच आकाच्या मुलाचे नाव घेतले आहे. म्हणजेच वाल्मिक कराड यांचा मुलगा सुशिल कराड याचे नाव घेतले आहे. तसेच पुढच्या तीन ते चार दिवसात आरोपींना अटक झालीच पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.



### वाल्मिक कराडचा मुलगा सुशीलला दिलासा

सोलापूर : एकीकडे वाल्मिक कराडभोवतीचा फास आवळला जात असताना दुसरीकडे त्याच्या मुलाला मात्र काहीसा दिलासा मिळाला आहे. सुशील कराडवर सोलापुरात गुन्हा दाखल करता येणार नाही असे सांगत बीड न्यायालयात त्याच्या विरोधात दाद मागावी असा आदेश सोलापूर न्यायालयाने दिला आहे. वाल्मिक कराडच्या मॅनेंजरच्या घरात घुसून त्याला मारहाण करणे, त्याच्या अल्पवयीन मुलीहा मारहाण करणे तसेच बंदुकीचा धाक दाखवून दोन बल्कर, दोन कार आणि सोने नेल्याचा आरोप करण्यात आला होता.

# ट्रम्प यांनी घेतली शपथ

न्युयार्क–डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७ वे अध्यक्ष म्हणून शपथ घेतली आहे. ट्रम्प यांनी शपथ घेतल्यानंतर अमेरिकेच्या दक्षिण सीमेवर आणीबाणी घोषित करण्यात आली आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ जानेवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६.५० क्विंटल | २,८०० | ३,१०० | २,९०० |
| ज्वारी/हायब्रिड : १८.०० क्विंटल | २,१३० | २,५०० | २,३२७ |
| मका/लोकल: ०.५० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :१०७.०० क्विंटल | ६,४८० | ७,१०० | ६,८८५ |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: २१.०० क्विंटल | २,५१० | ४,१५० | ३,०९० |
| मुग : ५.५० क्विंटल | ७,३०१ | ७,४५० | ७,३७५ |
| सोयाबीन: १५४.५० क्विंटल | ३,८०० | ४,१२० | ४,०५१ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ७,७०० | ७,७०० | ७,७०० |

# दावोसमध्ये पहिल्याच दिवशी महाराष्ट्राचा डंका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर उद्योजकांनी दाखवला विश्वास; ५ लाख कोटींची विक्रमी गुंतवणूक





**मुंबई । प्रतिनिधी**

**सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोसच्या दौऱ्यावर आहेत. दावोसमधून महाराष्ट्रासाठी मोठी बातमी समोर आली आहे. ती म्हणजे दावोस येथे पहिल्याच दिवशी रेकॉर्डब्रेक पाच लाख कोटींची गुंतवणूक नोंदवून महाराष्ट्र सरकारने विक्रमी ओपनिंग केली आहे. यामुळे भविष्यात मोठ्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. याबाबत मंत्री उदय सामंत यांनी माहिती दिली आहे.**

दावोस येथे पहिल्याच दिवशी रेकॉर्डब्रेक पाच लाख कोटींची गुंतवणूक नोंदवून महाराष्ट्र सरकारने विक्रमी ओपनिंग केली आहे, असे उदय सामंत यांनी म्हटले आहे. सोबतच येत्या तीन महिन्यांमध्ये राज्यात मोठा राजकीय भूकंप पाहायला मिळेल, शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसचे अनेक आमदार आणि महत्त्वाचे नेते फुटणार आहेत. ते एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्विकारणार आहेत असा दावा देखील यावेळी उदय सामंत यांनी केला आहे. आज पुन्हा एकदा दावोसमधून महाराष्ट्राच्या जनतेशी संवाद साधताना आनंद होत आहे. आजचा दिवस हा महाराष्ट्रासामधील गुंतवणुकीसाठी अतिशय महत्त्वाचा आणि आनंदाचा दिवस आहे. मला सांगताना आनंद वाटतो की, आज दिवसभरामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुमारे पाच लाख कोटीपर्यंतची गुंतवणूक आणण्यात यश मिळालं आहे. उद्या देखील अशाप्रकारची गुंतवणूक आणण्यात यश मिळेल. मी जसं महाराष्ट्रातून दावोसला येत असताना सांगितले होते. विक्रमी गुंतवणूक महाराष्ट्रात येईल, त्याला आज सुरुवात झाली आहे. महाराष्ट्राच्या जनतेनं आमच्यावर टाकलेला विश्वास महायुतीच सरकार म्हणून आम्ही सार्थ ठरवण्यासाठी प्रयत्न करत आहोत, असे उदय सामंत यांनी म्हटले आहे. दरम्यान उदय सामंत यांच्यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आरोप केला होता. फडणवीसांच्या शपथविधीपूर्वीच शिवसेनेत फूट पडणार होती असे त्यांनी म्हटले होते. संजय राऊत यांच्या या आरोपाला देखील उदय सामंत ◀◀ पान २ वर

# शासन निर्णयाचे उल्लंघन करत समाजकल्याण विभागामध्ये २ कोटींचे कामे सुरू

**बीड । प्रतिनिधी**

येथील समाजकल्याण विभागामध्ये ६० लक्ष रुपयचे सीसीटीव्ही बसविणे, १० लाखाचे सोलार हायमास्ट बसविणे तसेच सामाजिक न्याय भवन बीड मधील ७ कार्यालयामध्ये ३० लाखाचे सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविणे यासह विविध कामे एकूण २ कोटींचे पालकमंत्री यांच्या पत्रान्वये मंजूर केले असून जिल्हाधिकारी बीड (नियोजन) यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच कामाची निविदा प्रणाली व खरेदी जी.एम. पोर्टलवरून समर्थ इलेक्ट्रिकल वर्क्स अँड जनरल सप्लायर्स औद्योगिक सहकारी संस्था बीड यांच्यामार्फत सुरू असल्याचे दिसून येत आहे. जिल्हाधिकारी बीड यांनी जी प्रशासकीय मान्यता दिली आहे ◀◀ पान २ वर

### जिल्हाधिकारी बीड यांनी खातरजमा न करता दिली प्रशासकीय मान्यता –अजय सरवदे

#### जिल्हाधिकारी बीड (नियोजन) यांनी प्रशासकीय मान्यता देताना खातरजमा करावी

अनुसूचित जातीच्या योजनेच्या निधीचा गैरवापर होणार नाही ही दक्षता घेत असून माहिती अधिकारातून पुन्हा एकदा समाज कल्याण बीड येथील घोटाळा होण्याअगोदर बाहेर निघाला आहे याबाबतची पुरावे संबंधित अधिकारी यांना पाठविण्यात आले असून लवकरच चौकशी समिती गठीत होईल. जिल्हा नियोजन समितीतील अधिकारी शासन निर्णयाचे उल्लंघन होते किंवा नाही याची खातरजमा न करता प्रशासकीय मान्यता देत आहेत सदर प्रकरणी यांची सखोल चौकशी होणे महत्त्वाचे आहे दिलेली प्रशासकीय मान्यता तात्काळ रद्द करावी अशी मागणी केली आहे.

# देशमुख कुटुंबांची भेट न घेण्याचे खरे कारण पंकजा मुंडेंनी सांगितले

## आ.सुरेश धसांच्या टिकेला उत्तर; भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली



**बीड। प्रतिनिधी**

संतोष देशमुख यांच्या हत्येला आता महिनाभरापेक्षा अधिक काळ झाला आहे, मात्र पंकजा मुंडे यांनी देशमुख यांच्या कुटुंबाची अजूनही भेट घेतलेली नाही, यामागचं कारण आता समोर आले आहे. संतोष देशमुखांच्या कुटुंबाची भेट का घेतली नाही? अखेर पंकजा मुंडेंनी देशमुख कुटुंबाची भेट का घेतली नाही, याचे कारण ◀◀ पान २ वर

### पंकजाताई आणि वहिणींमध्ये बोलणे झाले–धनंजय देशमुख

दरम्यान पंकजा मुंडे यांच्या या वक्तव्यावर संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. आमच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे, व्यक्त होता येत नाही. मात्र पंकजा ताई जे बोलत आहेत, त्याबद्दल त्यांचे आणि वहिणींचे बोलणे झाले होते असा खुलासा धनंजय देशमुख यांनी केला आहे.

### नेमकं काय म्हणाल्या पंकजा मुंडे?

संतोष देशमुख यांच्या कुटुंबाच्या विनंतीवरूनच मी मस्साजोगमध्ये गेले नाही. त्यांनीच मला विनंती केली ताई तुम्ही इथे येऊ नये, इथलं वातावरण बरोबर नाही. आता त्यांची परवानगी घेऊनच मी तिथे जाणार आहे, असे मी आधीच जाहीर केले आहे. माझ्या जाण्यापेक्षा न्याय तीथे आधी गेला पाहिजे, त्यांना भेटणं संतोष देशमुख यांच्या मृत्यूबद्दल संवेदना व्यक्त करणं हा माझा सर्वस्वी वैयक्तिक निर्णय आहे, त्याचे प्रदर्शन मांडणे योग्य नाही, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

cmyk

## अग्रलेख

# पालकमंत्रीपद अन् महायुतीत महाधुसफूस!

नाशिक आणि रायगड जिल्हा पालकमंत्रिपद रद्द करण्याची नामुष्की सरकारवर आणि मुख्यमंत्र्यांवर ओढवणे ही गंभीर बाब आहे. महायुतीला विधानसभा निवडणुकीत राक्षसी बहुमत मिळाले, त्यामुळे महायुतीतील तिन्ही पक्षांच्या नेत्यांच्या आणि आमदारांच्या महत्त्वाकांक्षांनी सुद्धा राक्षसी रूप धारण केल्याचे स्पष्ट दिसते आहे. आधी मंत्रिमंडळ विस्तार, नंतर खातेवाटप आणि आता पालकमंत्रिपदावरून ही बाब अधिकच स्पष्ट झाली आहे. त्यामुळे सरकारमध्ये सारे काही आलबेल नाही हे निश्चित! मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर सतत चर्चा होती ती पालकमंत्रिपदांची. अखेर एकदाची पालकमंत्रिपदाची यादी जाहीर झाली. यादी पाहून काहींचे चेहरे खुलले तर काहींचे काळवंडले. महायुतीतील घटक पक्षांमध्ये पालकमंत्रिपदावरून तीव्र स्वरूपाची स्पर्धा होती, काही जिल्ह्यांच्या पदांवरून मतभेदही होते.

या गोष्टींचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे पालकमंत्री हे पद किती महत्त्वाचे झाले आहे ते लक्षात यावे. अर्थात जिल्ह्याचे पालकमंत्री काय काम करतात हे सांगणे न लगे! कारण त्याचा अनुभव जनतेला पदोपदी आला आहे, येत राहील. अलिकडे पालकमंत्री हे पद दोन कारणांसाठी अधिक चर्चेत आहे. एक म्हणजे झेंडावंदन आणि दुसरे म्हणजे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदारांसोबत होणारी बाचाबाची! मात्र, त्या पलीकडे जाऊन जिल्ह्याच्या विकासात पालकमंत्र्यांचा वाटा हा फार महत्त्वाचा मानला जातो. अनेक मंत्री जिल्ह्यातील राजकीय गणिते आपल्या हाती असावीत यासाठी हे पद आपल्या हाती असावे म्हणून आग्रही असतात. पालकमंत्री हा कॅबिनेटस्तरीय मंत्री असतो जो राज्य सरकारद्वारे राज्यातील विशिष्ट जिल्ह्याच्या विकासावर देखरेख ठेवण्यासाठी नियुक्त केला जातो. पालकमंत्री जिल्ह्यातील विविध राज्य सरकारी योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवतात आणि जिल्ह्याचे प्रशासन कार्यक्षमतेने चालत असल्याची खात्री करतात.

पालकमंत्री राज्य सरकार, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. सरकार म्हणून त्या जिल्ह्याची जबाबदारी ही पालकमंत्र्यांची असते. त्या त्या जिल्ह्यात सरकारी योजना, विकासकामे, मोठे प्रकल्प, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर समन्वय राखणे, जिल्ह्यासाठी निधीची तरतूद करण्याची जबाबदारी पालकमंत्र्यांकडे असते. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष हे पालकमंत्री असतात. तसे पाहिल्यास राज्यघटना अथवा सरकारच्या कामकाजाच्या नियमात पालकमंत्रिपदाची तरतूद नाही. हे पद महाराष्ट्रातच प्रथम अस्तित्वात आले. १९७२ नंतर जिल्ह्याचे प्रभारी म्हणून मंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली होती, पुढे ही पद्धत तशीच सुरू राहिली. याच दरम्यान ७४व्या घटनादुरुस्तीनुसार प्रत्येक जिल्ह्यात नियोजन समिती असली पाहिजे, अशी तरतूद करण्यात आली.

या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून पालकमंत्री नेमला जातो. तेव्हापासून पालकमंत्रिपद अस्तित्वात आले. कालांतराने या पदाची कार्यपद्धती तीच राहिली मात्र, त्याला वेगळे रंग येत गेले. फक्त या निमित्ताने जिल्ह्यातील सत्ता आपल्या हाती असावी आणि त्या भागात होणा-या आर्थिक व्यवहाराची सूत्रे आपल्या ताब्यात राहावीत म्हणून पालकमंत्रिपदावरून वाद होत असतील तर ती दुर्दैवाची गोष्ट म्हणावी लागेल. पालकमंत्री एवढे प्रभावी का ठरतात, त्यांच्या नेमणुकांसाठी एवढी चढाओढ का होते हे जनतेला न उलगडणारे कोडे राहिलेले नाही. पालकमंत्र्यांकडे राजकीय नेता अथवा पक्षाचे जिल्ह्यावर नियंत्रण वाढवण्याचा एक भाग म्हणून पाहिले जाते. कारण मंत्री हे नागरिकांच्या संपर्कात असणे अभिप्रेत आहे. या पदासाठी मोठ्या प्रमाणावर लॉबिंग होण्याचे कारण काय हे सा-यांनाच ठाऊक आहे. राज्यात होणारी विकासकामे इतक्या निकृष्ट दर्जाची का होतात, या प्रश्नाच्या उत्तरात ते दडले आहे.

सध्या महायुतीमध्ये पालकमंत्रिपदावरून मिठाचा खडा पडला आहे. नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाच्या मुद्यावरून शिंदे सेना नाराज असून पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या दरे गावी गेले आहेत. एखादा अटीतटीचा प्रसंग निर्माण झाला की आपला आतला आवाज ऐकण्यासाठी अथवा निर्णय घेण्यासाठी एकनाथ शिंदे आपल्या दरे गावी निघून जातात असे अनेक वेळा दिसून आले आहे. महायुतीत समन्वयक म्हणून काम पाहणारे आशिष कुलकर्णी यांना फोन करून पालकमंत्रिपदाबाबतची आपली नाराजी एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली म्हणे. रायगडमध्ये शिवसेनेचे जास्त आमदार असतानाही डावलले गेल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. दादा भुसे हे ज्येष्ठ मंत्री असूनही त्यांना कोणत्याच जिल्ह्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले नाही उलट भाजपच्या नवख्या मंत्र्यांनाही पालकमंत्रिपद दिल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. उपमुख्यमंत्री शिंदे महायुतीवर नाराज असल्यानेच ते दरे गावी गेल्याची चर्चा आहे.

त्याबाबतचे स्पष्टीकरण देताना शिंदे म्हणाले, मी माझ्या गावी आलो की माझ्या नाराजीची चर्चा होते, पण मी इथल्या विकासकामासाठी गावी आलो आहे. गोगावले व भुसे यांनी पालकमंत्रिपदाची अपेक्षा ठेवण्यात वावगे काहीच नाही असेही शिंदे म्हणाले. पालकमंत्रिपदावरून महायुतीत खदखदत असलेला असंतोष सोमवारी अधिकच भडकला. मंत्रिमंडळ विस्तारापासून सुरू झालेली धुसफूस पालकमंत्रिपदे जाहीर झाल्यापासून अधिकच वाढली आणि अवघ्या २४ तासांत पालकमंत्रिपदाला स्थगिती देण्याची नामुष्की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ओढवली. त्यामुळे सत्तारूढ महायुतीमधील बेबनाव अधिकच स्पष्ट झाला. आता पालकमंत्री बदलतील, उद्या मंत्री, उपमुख्यमंत्री बदलतील, ही परिस्थिती बघून जनतेलाच या सरकारला बदलावे लागेल अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

तिन्ही पक्षांमध्ये जिल्ह्याच्या विकासापेक्षा जिल्ह्यात मलिदा कोण खाणार याची स्पर्धा सुरू आहे. यातूनच नाराजी समोर येत आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी देणार? उलट लाडक्या बहिणींचे लाभार्थी कमी केले जात आहेत. शेतक-यांच्या कर्जमाफीकडे सरकारचे लक्ष नाही, फक्त एकमेकात वाद घालून महाराष्ट्राला खड्ड्यात घालण्याचे काम सरकार करीत आहे अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मागे २० आमदार आहेत. त्यामुळे सतत वेगवेगळ्या मागण्यांसाठी हट्ट करणारे एकनाथ शिंदे यांना दूर लोटून लवकरच नवीन 'उदय' होईल असा विरोधकांनी गौप्यस्फोट केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस गुंतवणूक परिषदेसाठी दावोसला गेले तेव्हा त्यांनी सोबत उपमुख्यमंत्री शिंदे यांना न नेता उदय सामंत यांना नेले आहे. त्यामुळे नव्या घडामोडी घडतील असे बोलले जात आहे. सध्या महायुतीत आलबेल नाही एवढे मात्र खरे!

# बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधारा आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रस्ताकामाला लवकरच सुरूवात

## • आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील बिंदुसरा नदीवर पूल कम बंधारा तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका पर्यंतचा मुख्य रस्ता होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. या कामाची निविदा प्रक्रिया झाली असून आता निवड झालेल्या कंत्राटदार कंपनीला विभागाकडून स्वीकृती पत्र देण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरूवात होणार आहे.**

मागील टप्प्यातच जरूड ते बार्शी नाका व छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिरापूर धुमाळ या रस्त्यांसाठी तब्बल २१३ कोटी रूपयांचा निधी आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून मंजूर होऊन कामदेखील जवळपास पूर्ण झाले आहे. परंतु शहरातील मुख्य असलेला बार्शी नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंतचा रस्ता नव्याने व्हावा याकरिता आ.क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्नशील होते. याबाबत केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी, महामार्ग विकास प्राधिकरण यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा, मागणी करून शेवटी या आ.क्षीरसागरांच्या प्रयत्नातून या कामाला मंजुरी मिळाली आहे. महामार्ग ३६१ ( ४७+००० ४९+५०० ) २.५ (अडीच) किलोमीटर लांबी अंतर असलेल्या महामार्गाचे चौपदरीकरण,



आणि नाली बांधकाम व बार्शी नाक्याजवळील बिंदुसरा नदीवर पूल कम कोल्हापूरी बंधारा बांधणे अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्याकडून याकामासाठी ४८ कोटी ८५ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) कोकण भवन, मुंबई यांच्याकडून कंत्राटदार कंपनीला स्वीकृती पत्र देण्यात आले आहे. यानंतर लवकरच कार्यारंभ आदेश होऊन कामाला प्रत्यक्ष सुरूवात होणार आहे. लवकरच कामाला प्रत्यक्ष सुरूवात होणार आहे. या रस्त्यामुळे रहादारीसाठी तर बिंदुसरा नदीवरील बंधार्यामुळे बीड परिसरात सिंचन आणि पाणी उपलब्धतेसाठी मोठा फायदा होणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतून बीडसाठी अतिशय फायदेशीर असलेले हे काम लवकरच होणार आहे.

### पूल कम बंधाऱ्यांचा सिंचन आणि पाणी साठवण्यासाठी मोठा फायदा

बिंदुसरा नदीवरील पूल कम कोल्हापूरी बंधार्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या साधारण ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरात पाणी पातळीत वाढ होणार असा तांत्रिक अंदाज आहे. बीड जिल्ह्यात पावसाची अनियमितता असल्याने प्रत्येक उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होते. परंतु या कोल्हापूरी बंधार्यामुळे पाणी साठवणूक होईल. परिणामी पाणी उपलब्धता आणि शेती सिंचनासाठी याचा खूप मोठा फायदा परिसरात होणार आहे. बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल ही संकल्पना मोठी दूरदर्शी होती. ती आ.संदीप क्षीरसागर यांनी डोळ्यासमोर ठेवून हे काम होण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अनेकवेळा अधिवेशनातही हा मुद्दा मांडला. दरम्यान आता आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश आले असून लवकरच हे काम पूर्ण झालेले असेल.

# विद्यार्थी मित्रानो आपली ओळख रंगावरून नव्हे तर सद्गुणावरून ठरते -गोंटे

**अंबड । प्रतिनिधी**

विद्यार्थी मित्रांनो आपली ओळख समाजात रंगावरून नव्हे तर सद्गुणावरून निर्माण होत असते.यासाठी आपण आपल्या कार्य कर्तव्याने यशाचे शिखर गाठायला शिकावे असे आवाहन बाबासाहेब गोंटे यांनी अंबड येथील मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने घनसावंगी तालुक्यातील खापरदेव हिवरा येथे सोमवारी (ता.२०) आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरातील बौद्धिक सत्रात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी डॉ. दत्तात्रय घोगरे व व्यासपिठावर कार्यक्रमाधिकारी प्रा. दीपक राखुंडे, प्रा. रवींद्र पैठणे, प्रा. संपत पवार यांची प्रमूख उपस्थिती होती. पुढे बोलताना बाबासाहेब गोंटे म्हणाले की, प्रत्येकांनी स्वतःच्या मनातील आत्मविश्वास जागायला हवा. यासाठी नेहमीच सकारात्मक विचार अंगी बाळगायला हवे. उभ्या आयुष्यात यशाचे शिखर गाठायचे असेल तर शिक्षणातून समाजात परिवर्तन घडवायला हवेत. विद्यार्थ्याला भाकरीची नव्हे तर पुस्तक वाचनाची भूक लागायला हवीत. जीवनात शिक्षणातून ज्ञानाच्या कक्षा रुंदवण्यास शिकले पाहिजे. यातूनच यशाचे शिखर प्रत्येकाला गाठता येऊ शकते. यासाठी मनात, जिद्द, चिकाटी व परिश्रम करण्याची तयारी ठेवायला हवीत असे आवाहन शेवटी बाबासाहेब गोंटे यांनी बोलताना केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. दत्तात्रय घोगरे यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेत आपले भवितव्य उज्ज्वल बनविण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

# पत्रकार संजय सानप जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते दर्पण पुरस्काराने सन्मानित



**पाटोदा । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड शाखेच्या वतीने पत्रकारांसाठी दर्पण दिनाच्या निमित्ताने देण्यात येणारा यंदाचा दर्पण पुरस्कार पाटोदा येथील पत्रकार संजय सानप यांना आज दि. २० जानेवारी सोमवार रोजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, माजी आमदार बदामराव पंडित, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, संतोष मानुरकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व प्रशासकीय.अधिकारी व पुरुस्कार प्राप्त पुरस्कारते उपस्थित होते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड शाखेच्या वतीने पत्रकारांसाठी दर्पण दिनाच्या निमित्ताने देण्यात येणारा यंदाचा दर्पण पुरस्कार पाटोदा येथील पत्रकार संजय सानप यांना नुकताच जाहीर झाला होता .महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा पत्रकार संघाच्या शाखेच्या वतीने दरवर्षी पत्रकार दिनाचे निमित्त साधून जिल्ह्यातील अकरा पत्रकार आणि एक वृत्तपत्र विक्रेता यांना पुरस्कार देऊन गौरवण्याची परंपरा आहे. यंदाचे हे पुरस्कार पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि संस्थापक अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या वतीने जाहीर करण्यात येऊन बीड येथे हा पुरस्कार देण्यात आला आहे यावेळी आलेले मान्यवर माजी मंत्री बदामराव पंडित आबा संपादक वैभव स्वामी भाजपाचे नेते सर्जेराव तात्या तांदळी मनसेचे जिल्हाप्रमुख कैलास दरेकर समाजसेवक बारगजे पत्रकार आमिर खान पठाण जावेद भाई शेख . मुरलीधर बप्पा ढाकणे पांडुरंग नागरगोजे यांनी पत्रकार संजय सानप यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

# लाडक्या बहिणींना लवकरच मिळणार जानेवारीचा हप्ता-आ. खोतकर

जालना । प्रतिनिधी

राज्यातील महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी राज्य सरकारतर्फे सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतील हप्ता हा २६ जानेवारी २०२५ रोजीच महिलांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती नवनिर्वाचित आमदार आणि जालना विधानसभा क्षेत्राचे लाकडी बहीण योजना अध्यक्ष श्री. अर्जुनराव खोतकर यांनी दिली आहे.



या संदर्भात अधिक माहिती देतांना आ. खोतकर म्हणाले की, राज्यातील युतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आले, त्यामुळे लाडक्या बहिणींना त्यांचे पैसे मिळणार नाही, अशा प्रकारच्या वावड्या विरोधकांकडून उठवण्यात येत होत्या. परंतू राज्य सरकारने जेव्हा डिसेंबरचा हप्ता महिलांच्या खात्यात जमा केला आणि आता जानेवारीचा हप्ता सुध्दा २६ जानेवारी २०२५ रोजीच महिलांच्या खात्यात जमा होणार आहे. ठरल्याप्रमाणे आणि युतीच्या जाहीरनाम्याप्रमाणेच महिलांना २१०० रुपयांचा हप्ता देण्यात येणार असुन या संदर्भात देखील लवकरच शासन निर्णय घेणार आहे असे सांगून आ. खोतकर म्हणाले की, महिलांच्या त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली असून २८ जून २०२४ रोजी या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. या योजनेमार्फत महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दर महिना रु. १,५०० असा आर्थिक लाभ देण्यात येतो. जालना तालुक्यातील जवळपास १,२३,५८० लाडक्या बहिणीच्या खात्यात पैसे जमा होणार आहे.तसेच बराज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मीतीस चालना देणे, त्यांचे आर्थिक व सामाजिक पुनर्वसन करणे, त्या स्वावलंबी व आत्मनिर्भर करणे, महिला व मुलींच्या सशक्तीकरणास चालना देणे, महिला आणि त्यांच्यावर अंवलबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश असून प्रत्येक पात्र महिलेला नियमानुसार तिच्या खात्यावर पंधराशे रुपये जमा होणार असल्याचेही आ. खोतकर यांनी सांगितले. बहुतेक करुन लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा हप्ता हा एप्रिल महिन्यापासून सुरु होईल, अशी माहितीही आ. खोतकर यांनी दिली आहे.

# गैरहजर अभियंत्यामुळे सर्व पाटबंधारे उपविभागीय कार्यालये वाऱ्यावर..

### कार्यालये असून अडचण नसून खोळंबा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथील पाटबंधारे वसाहतीतील कृष्णा खोरे महामंडळ अंतर्गत उपविभागीय अभियंता, लघु पाटबंधारे, जलसंधारण उपविभागाचे तीन कार्यालये असून या उपविभागातील अभियंते सतत गैरहजर राहत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे हे सर्व कार्यालय म्हणजे असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था झाली आहे या ठिकाणी अधिकारीच हजर राहत नसल्याने शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत.अधिकारी कधी येतात आणि कधी जातात हे त्या कार्यालयात कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना देखील माहिती होत नाही त्यामुळे शेतकऱ्यांसह अनेक जणांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.




शासनाने शेतकऱ्यांना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आष्टी येथे कृष्णा खोरे महामंडळाचे उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे शासकीयकऱ्यांच्या शेतजमिनी बाबत पाण्याच्या विविध वापरांच्या संदर्भात पाणी फायदे सामान्य धोरण मार्गदर्शक तत्त्वे आणि मूल्यांकनासाठी कार्यक्रम घेणे इत्यादी बाबी तसेच सिंचन तलाव,पाझर तलाव, को.प.बंधारे,पक्के बंधारे,वळण बंधारे लघु पाटबंधारे योजनांचे बांधकाम या कार्यालयामार्फत केले जातात मात्र गेल्या अनेक दिवसापासून या कृष्णा खोरे महामंडळ अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय लघु पाटबंधारे कार्यालयात प्रभारी म्हणून उप उपविभागीय अभियंता म्हणून कार्यरत असलेले उपविभागीय अभियंता रमेश आडे हे अधिकारी सतत हजर नसल्याने शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत असून या कार्यालयातून कसल्याही प्रकारे शेतकऱ्यांना माहिती मिळत नाही. या कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यावर शेतकऱ्यांनी प्रस्तुत प्रतिनिधींकडे तीव्र नाराजी व्यक्त केली असून वरिष्ठांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अचानक या ठिकाणी स्पॉट पंचनामा करून अधिकारी का येत नाहीत याची उकल करावी.अधिकारी पगार मात्र घेतात तर कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने शासकीय इमारतही रिक्त राहत आहे.दिवसाढवळ्या या कार्यालयामध्ये एखादा कर्मचारी सोडता कोणीही उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. आष्टीच्या एका उपविभागातील पालवणकर नावाचे अभियंता प्रभारी उप अभियंता नुकतेच निवृत्त झाले आहेत पूर्ण सेवेत असताना देखील कधीही हजर राहिले नाहीत ते आता सेवानिवृत्त झाल्यावर परत हजर झाले त्यांना रोजंदारीवर पूर्ववत कामावर का घेण्यात आला आहे असा सवाल निर्माण झालेला आहे या गैरहजर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांचे शासनाकडे सर्व

या योजनेत येत असणारे बोगस अर्ज आणि गैरव्यवहारांमुळे योजनाच बंद करण्याच्या शिफारशीवर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रीया उमटत आहेत. बोगस अर्जांमुळे तसेच गैरव्यवहारांमुळे 'एक रुपयात पीकविमा योजना' बंद करण्याचा विचार करणे म्हणजे 'उन्हात पाय भाजतात म्हणून पायात चप्पल घालण्याऐवजी संपूर्ण पृथ्वीवर चामडे अंथरण्यासारखे आहे' असे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार म्हणाले आहेत. काही ठराविक लोकांच्या चुकीमुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दंड देणे योग्य होणार नाही. मुळात मुळात आज तंत्रज्ञान एवढे प्रगत असताना बोगस अर्ज येतातच कसे? शासनाकडे शेतकऱ्यांचे आधार कार्ड, ७/१२ उतारे यांचे सर्व डिटेल्स असताना बोगस अर्ज का ओळखता येऊ शकत नाहीत? असा सवालही रोहित पवारांनी केला आहे. माध्यमावर त्यांनी याबाबत पोस्ट केली आहे. पीकविमा योजनेत ३५० कोटींचा घोटाळा झाल्याची शक्यता आहे. एकूण १६ कोटी १९ लाख ८८० अर्ज मंजूर झाले होते. त्यापैकी चार लाखांच्या सुमारास बोगस अर्ज निघाले आहेत. पीकविमा योजनेत गैरव्यवहार झाल्याचं कृषी सचिवांनी सांगितल्यानंतर राज्य सरकार यावर काय निर्णय घेत आहे हे महत्वाचे ठरणार आहे. दरम्यान, ठरावीक लोकांच्या चुकीमुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना योजना बंद करून दंड करणे योग्य होणार नाही असे रोहित पवार म्हणालेत.

--------------

### खंडणी मागितली त्या

आंधळे हे सर्व हत्येतील आरोपी यात पाहायला मिळत आहेत. या नव्या फुटेजमुळे वाल्मिक कराड यांच्या अडचणीत वाढ होणार असल्याचे संकेत आहेत.

-------------

### शासन निर्णयाचे उल्लंघन करत समाजकल्याण

ती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई यांचा शासन निर्णय २२ मार्च २०१७ च्या नियम अटीचे उल्लंघन करणारा आहे. अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत नाविन्यपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविण्यासाठी ३% निधी राखीव ठेवला जातो. समाज कल्याण विभाग बीड या ठिकाणी सुरू असलेल्या कामांमध्ये कसल्याही प्रकारचे नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण नसल्यामुळे सदरील कामे शासन निर्णयाचे उल्लंघन करणारे आहेत. जिल्हा नियोजन समितीची मान्यता न घेताच ही कामे सुरू केल्याचे दिसून येत आहेत हे सर्व नियमबाह्य असल्याने याबाबत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी मा.प्रधान सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई, मा.आयुक्त, मा.प्रादेशिक उपायुक्त, मा.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड यांचे कडे ईमेलद्वारे तक्रार दाखल केलेली आहे. या अगोदर अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत नाविन्यपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविण्यासाठी तीन टक्के निधी राखीव ठेवला जातो यामध्ये तत्कालीन प्रभारी सहाय्यक आयुक्त डॉ. सचिन मडावी यांनीही नियमबाह्य खरेदी केली होती यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी तक्रार दिली होती तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी झाली व सदर प्रकरणी शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. पुन्हा तोच प्रकार २०२४-२५ मध्ये आढळून येत आहे सदरील कामे पूर्ण होणे अगोदरच अजय सरवदे यांनी थांबवली आहेत.

------------

### दावोसमध्ये पहिल्याच दिवशी

यांनी यावेळी उत्तर दिले आहे. येत्या तीन महिन्यांमध्ये राज्यात मोठा राजकीय भूकंप पाहायला मिळेल, शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसचे अनेक आमदार आणि महत्त्वाचे नेते फुटणार आहेत. ते एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्विकारणार आहेत असे सामंत यांनी म्हटले आहे.

--------------

### देशमुख कुटुंबांची भेट

सांगितले आहे. आ. सुरेश धस यांनी याबाबत पंकजा मुंडेंवर टिका केली होती. बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली. या घटनेनंतर राज्यातलं वातावरण चांगलेच तापले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सात आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, तर एक फरार आहे. वाल्मिक कराडवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी राज्यभरात आक्रेश मोर्चाचे आयोजन करण्यात येत आहे. दरम्यान या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची देखील मागणी करण्यात आली आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी सुरुवातीपासूनच या प्रकरणात आक्रमक भूमिका घेतली आहे. संतोष देशमुख यांची हत्या होऊन महिना उलटला तरी पंकजा मुंडे यांनी देशमुख कुटुंबाची भेट घेतली नाही, यावरून सुरेश धस यांनी पंकजा मुंडे यांच्यावर निशाणा साधला होता. अखेर आपण संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट का घेतली नाही, याबाबत स्वत: मंत्री पंकजा मुंडे यांनी मोठा खुलासा केला आहे.


---------

# शासनाकडे शेतकऱ्याचे सर्व डिटेल्स तरी बोगस अर्ज येतात कसे?

## रोहित पवारांचा सवाल, म्हणाले संगनमताशिवाय..

राज्यात एक रुपयात पीक विमा योजना ()बंद करण्यात यावी अशी शिफारस कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या योजनेत येत असणारे बोगस अर्ज आणि गैरव्यवहारांमुळे योजनाच बंद करण्याच्या शिफारशीवर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रीया उमटत आहेत.

बोगस अर्जांमुळे तसेच गैरव्यवहारांमुळे 'एक रुपयात 'पीकविमा योजना' बंद करण्याचा विचार करणे म्हणजे 'उन्हात पाय भाजतात म्हणून पायात चप्पल घालण्याऐवजी संपूर्ण पृथ्वीवर चामडे अंथरण्यासारखे आहे' असं राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार म्हणालेत. काही ठराविक लोकांच्या चुकीमुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दंड देणे योग्य होणार नाही. मुळात मुळात आज तंत्रज्ञान एवढे प्रगत असताना बोगस अर्ज येतातच कसे? शासनाकडे शेतकऱ्यांचे आधार कार्ड, ७/१२ उतारे यांचे सर्व डिटेल्स असताना बोगस अर्ज का ओळखता येऊ शकत नाहीत? असा सवालही रोहित पवारांनी केलाय. माध्यमावर



त्यांनी याबाबत पोस्ट केली आहे.

पीकविमा योजनेत ३५० कोटींचा घोटाळा झाल्याची शक्यता आहे. एकूण १६ कोटी १९ लाख ८८० अर्ज मंजूर झाले होते. त्यापैकी चार लाखांच्या सुमारास बोगस अर्ज निघाले आहेत. पीकविमा योजनेत गैरव्यवहार झाल्याचं कृषी सचिवांनी सांगितल्यानंतर राज्य सरकार यावर काय निर्णय घेतंय हे महत्वाचं ठरणार आहे. दरम्यान, ठरावीक लोकांच्या चुकीमुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना योजना बंद करून दंड करणे योग्य होणार नाही असं रोहित पवार म्हणालेत.

काय म्हटलंय रोहित पवारांनी?

बोगस अर्जांमुळे तसेच गैरव्यवहारांमुळे 'एक रुपयात 'पीकविमा योजना' बंद करण्याचा विचार करणे म्हणजे 'उन्हात पाय भाजतात म्हणून पायात चप्पल घालण्याऐवजी संपूर्ण पृथ्वीवर चामडे अंथरण्यासारखे आहे'. त्यामुळे काही ठराविक लोकांच्या चुकीमुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दंड देणे योग्य होणार नाही.

मुळात आज तंत्रज्ञान एवढे प्रगत असताना बोगस अर्ज येतातच कसे? ज्याप्रमाणे प्लॅटफॉर्मवर एका स्क्रीनचे सबस्क्रीप्षण असेल तर दुसऱ्या स्क्रीनवर करताच येत नाही तर मग त्याचप्रमाणे शासनाकडे शेतकऱ्यांचे आधार कार्ड, ७/१२ उतारे यांचे सर्व डिटेल्स असताना बोगस अर्ज का ओळखता येऊ शकत नाहीत?बोगस अर्जांमुळे तसेच गैरव्यवहारांमुळे 'एक रुपयात 'पीकविमा योजना' बंद करण्याचा विचार करणे म्हणजे 'उन्हात पाय भाजतात म्हणून पायात चप्पल घालण्याऐवजी संपूर्ण पृथ्वीवर चामडे अंथरण्यासारखे आहे'. त्यामुळे काही ठराविक लोकांच्या चुकीमुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दंड देणे योग्य होणार

# शेवाळाची शेती करून मिळतो मोठा नफा




शेतकरी मित्रांनो शेतीमध्ये नवनवे तंत्रज्ञान विकसीत झाले आहे त्यामुळे केवळ जमिनीतून होणारी लागवड नव्हे तर इतर पद्धतीने देखील लागवड करता येते. स्पिरुलिना लागवड म्हणजेच शेवाळाची शेती आता चांगल्या पैकी विकसीत होत आहे. त्यातून प्रचंड उत्पन्न मिळते. आरोग्यदायी फूड सप्लिमेंट म्हणून त्याचा आहारात वापर केला जातो. ते खूप महागड्या किमतीने विकले जाते. जेव्हापासून स्पिरुलिनाची टॅबलेट काढली, तेव्हापासून देशातील मोठे व्यापारीही त्याच्या लागवडीत आले आहेत. स्पिरुलिनाच्या उत्पादकांना हवे असल्यास ते स्वतः गोळ्या बनवू शकतात आणि त्यांच्या कंपनीच्या किंवा फर्मच्या लोकांना ठेवून त्या विकू शकतात. यामुळे त्यांना अधिक कमाई होईल.

स्पिरुलिना लागवडीसाठी महत्त्वाच्या गोष्टी : स्पिरुलिनाच्या लागवडीसाठी, आपण ज्या क्षेत्रात लागवड करत आहोत त्या क्षेत्राचे तापमान १५ अंश सेल्सिअस ते ४५ अंश सेल्सिअस असावे. परंतु ते १५ डिग्री सेल्सियसपेक्षा कमी नसावे. यासोबतच पाण्याचा ९ पेक्षा जास्त असावा. पण समुद्राच्या क्षेत्रापासून दूर असलेल्या भागात सोडियम क्लोराईड, बेकिंग सोडा आणि मीठ टाकून पाण्याचा पीएच वाढवता येतो.

स्पिरुलिना कशी वाढवायची : जर स्पिरुलिनाची लागवड करायची असेल, तर तुम्ही त्यासाठी टाकी बनवू शकता किंवा स्वस्तात काम करायचे असल्यास, तुम्हाला खड्डा खोदून त्यात प्लास्टिक टाकावे लागेल. त्यात आधी पाणी टाकावे लागते. तुम्ही टाकत असलेल्या पाण्याची पीएच पातळी नऊ असावी. पाण्यात प्रति हजार लिटर मागे एक किलो मदर कल्चर म्हणजेच शेवाळ स्लरी सोडल्या जातात. त्यानंतर ठराविक वेळा पर्यंत पाणी ढवळून ठेवले जाते. सुमारे ३० ते ४५ दिवसांपर्यंत स्पिरुलिनाची वाढ काढणी योग्य होते. त्यानंतर ५०० मायक्रोनच्या जाळीतून पाणी पूर्णपणे काढून टाकले जाते. तयार स्पिरुलिनाचे नूडल्स किंवा पापड करून तापमानामध्ये सुकवली जातात पावडर तयार करून पुढे यंत्राद्वारे टेबलेट्स तयार केल्या जातात.

स्पिरुलिनाचे उत्पादन दररोज सरासरी आठ ग्रॅम प्रति चौरस मीटर आहे. या अर्थाने एका एकरात दररोज ३२ किलो उत्पादन होईल. त्याची सरासरी ८०० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होते. त्यानुसार एका दिवसात २५९०० रुपये येतात. एका महिन्यात ते सात लाख रुपयांपेक्षा जास्त पैसे देते. त्याचे प्रशिक्षण भारत सरकारच्या एमएसएमई मंत्रालयाच्या अंतर्गत दिले जाते.

# जनावरांच्या कानात आधार कार्ड टॅग का लावण्यात येतो?

शेतकऱ्यांचा जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे पाहिले जाते. यामुळे यातून शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न मिळते. तसंच सरकारकडून देखील दूध उत्पादकांसाठी नवनवीन योजना देखील राबवल्या जातात. तसंच जनावरांची संख्या जाणून घेण्यासाठी केंद्र सरकारकडून आता टॅगीग देखील केलं जात आहे. केंद्र सरकार राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत गायी, म्हशी, डुक्कर आणि बकऱ्यांच्या कानात टॅग लावण्याच्या योजनेवर काम करत आहे. याचे फायदे देखील आहेत.

जनावरांच्या कानात का असतो पिवळा टॅग?

अनेकदा आपल्या गाई-म्हैशी आणि इतर जनावरांच्या कानात पिवळा टॅग दिसून येतो. त्याला जनावरांचे आधार कार्ड म्हटले जाते. जसे माणसांची ओळख पटवण्यासाठी आधार कार्ड असते. तसेच जनावरांचे देखील आजकाल आधार कार्ड तयार केले जात आहे. गाई-म्हशींच्या कानाला लावलेला टॅगही महत्त्वाचा आहे, जो त्यांच्यासाठी आधार कार्डपेक्षा कमी नाही. यामध्ये देखील सगळी माहिती आपल्याला समजणार आहे.

याबाबत माहिती अशी की, जनावरांना हा टॅग लसीकरणापूर्वी लावला जातो. केंद्राच्या राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रमाचा एक भाग आहे. या कार्यक्रमांतर्गत प्राण्यांना , खूर आणि तोंड आणि ब्रुसेलोसिस विरुद्ध लसीकरण केले जाते. याआधी, लसीकरणाची माहिती अद्ययावत राहण्यासाठी आणि ओळखीसाठी जनावरांच्या कानात टॅग लावले जातात.टॅग लावल्यानंतर जनावरांची माहिती अपलोड : टॅग लावताना प्राण्यांना १२ अंकी ओळख क्रमांक देखील दिला जातो. ज्याद्वारे लसीकरणाची माहिती वेळोवेळी अपडेट केली जाते. प्राण्यांची नोंदणी माहिती नेटवर्क पशु उत्पादकता आणि आरोग्य प्लॅटफॉर्मवर अपलोड केली जाते. जनावराचे लसीकरण तसेच इतर गोष्टी देखील सेव्ह केल्या जातात. यामुळे जनावर आजारी पडले तरी त्याची माहिती लगेच मिळते. दरम्यान, टॅगच्या आधारे अनेक योजनांचा लाभ घेता येईल. विविध योजनांमध्ये टॅग केलेल्या नोंदणीकृत जनावरांना प्राधान्य दिले जाते. त्याचबरोबर प्राण्यांच्या विम्यामध्ये हा टॅग अनिवार्य करण्यात आला आहे. तर जनावरांची चोरी झाल्यास हा टॅग अतिशय फायदेशीर आहे, ज्याद्वारे जनावरांचा शोध घेता येतो. यामुळे तुम्ही देखील आपल्या जनावरांना हा टॅग लावून घ्या.



# रंगीबेरंगी फुलकोबीच्या लागवडीत नफाच नफा, बदलणार शेतकऱ्यांचे नशीब!

शेतीमध्ये सध्या अनेक बदल होत चालले आहेत. आता रंगीबेरंगी भाज्यांना मागणी जास्त आहे. सध्या रंगीबेरंगी फुलकोबीच्या लागवडीतून शेतकरी चांगला नफा कमावत आहेत. फुलकोबीला रंगही असू शकतो हे पाहून कदाचित अनेकांना आश्चर्य वाटेल, पण पिवळ्या आणि जांभळ्या रंगाच्या फुलकोबीची लागवड देशाच्या अनेक भागात केली जात आहे. जे आरोग्यासाठीही खूप फायदेशीर मानले जातात.

कॅरोटीना-व्हॅलेंटिना फायदेशीर : फुलकोबीच्या विदेशी जातींमध्ये कॅरोटीना आणि व्हॅलेंटिना यांचा समावेश होतो. कॅरोटीनचा रंग पिवळा आणि व्हॅलेंटीनाचा रंग जांभळा असतो, या दोन्ही जाती लावणीनंतर ७५ ते ८५ दिवसांत पिकतात.त्यामध्ये व्हिटॅमिन-ए देखील असते.रंग हा आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो, पण आकारही सामान्य असतो. पेक्षा जास्त घडते एक ते दोन किलो वजनाची ही फुलकोबी वाढवून तुम्ही सामान्य कोबीपेक्षा दुप्पट उत्पादन आणि नफा मिळवू शकता. चला जाणून घेऊया शेतीची पद्धत

माती आणि हवामान: रंगीत फुलकोबीच्या लागवडीसाठी माती आणि हवामान : सामान्य फुलकोबीप्रमाणेच थंड आणि ओलसर हवामान



योग्य आहे. झाडांच्या योग्य वाढीसाठी तापमान २०-२५ अंश सेल्सिअस असावे. जीवाश्मांनी समृद्ध असलेली माती फुलकोबीसाठी चांगली असते. यासोबतच ड्रेनेजची योग्य व्यवस्था असावी. माती मूल्य ५.५ ते ६.६ दरम्यान असावे.

रंगीत फुलकोबीची पेरणी : शेताची ३ ते ४ नांगरणी केल्यानंतर पायाने समतल करा, त्यानंतर रंगीत फुलकोबीच्या लागवडीसाठी रोपवाटिका तयार करावी. एक हेक्टरसाठी सुमारे २००-२५० ग्रॅम बियाणे आवश्यक आहे. रोपवाटिकेत बियाणे पेरल्यानंतर झाडे ४ ते ५ आठवड्यांची झाल्यावर ते शेतात लावावेत. रोप लावल्यानंतर थोडे पाणी द्यावे. फुलकोबी लागवडीसाठी सप्टेंबर ते ऑक्टोबर हा उत्तम काळ आहे.

खत आणि सिंचन ': चांगल्या उत्पादनासाठी योग्य प्रमाणात खतांचा वापर करणे आवश्यक आहे. चांगले कुजलेले शेण मातीत मिसळावे व माती परीक्षण केल्यानंतर आवश्यकतेनुसार रासायनिक खते टाकावीत.

माती परीक्षण केले नसल्यास १२० किलो नायट्रोनस, ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. रोपे लावण्यापूर्वी १५ दिवस आधी शेणखत आणि कंपोस्ट जमिनीत मिसळा. झाडांच्या वाढीसाठी १०-१५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

कापणी : रोपे लावल्यानंतर १००-११० दिवसांनी झाडे काढणीसाठी तयार होतात. एक हेक्टरमधून सरासरी २००-३०० क्विंटल कोबीचे पीक मिळते. रंगीबेरंगी फुलकोबीला बाजारात चांगला भाव मिळतो, त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक नफा मिळतो.




### जागतिक दिवस
### राष्ट्रीय आलिंगन दिन

### महत्वाच्या घटना

१९०१ : राणी व्हिक्टोरियाच्या निधनानंतर ७ वा एडवर्ड हा इंग्लंडचा राजा झाला.
१९२४ : रॅम्से मॅकडोनाल्ड इंग्लंडचे पंतप्रधान बनले. ब्रिटनमधे मजूरपक्ष प्रथमच सत्तेवर आला.
१९४७ : भारतीय घटनेची रुपरेषा कशी असावी याविषयीचा ठराव घटना समितीत मंजूर
१९६३ : डेहराडून येथे अंधांसाठी राष्ट्रीय ग्रंथालय स्थापन केले.
१९७१ : सर्व मित्र सिकरी यांनी भारताचे १३ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९२ : रॉबर्टा बॉन्डर या अवकाशात जाणाऱ्या पहिला महिला ठरल्या.
१९९९ : ऑस्ट्रेलियन धर्मप्रसारक ग्रॅहॅम स्टेन्स व त्याच्या दोन मुलांची ओरिसाच्या केओंझार जिल्ह्यातील मनोहरपूर येथे मोटारीत जाळून हत्या करण्यात आली.
२००१ : 'आय. एन. एस. मुंबई' ही क्षेपणास्त्रवाहू नौका भारतीय नौदलात समारंभपूर्वक दाखल झाली.
२००६ : इवा मोराल्स यांनी बोलीवियाचे नवीन राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतली.
२०१५ : बेटी बचाओ, बेटी पढाओ या योजनेची स्थापना विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पानिपत हरियाणा येथे झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६१ : सर फ्रँन्सिस बेकन - इंग्लिश तत्त्ववेत्ते व मुत्सद्दी (मृत्यू: ९ एप्रिल १६२६)
१८७७ : आसाम चे प्रमुख कार्यकर्ते तरुण राम फुकन यांचा जन्म.
१८९२ : भारताचे स्वातंत्र्य सैनिक ठाकुर रोशन सिंह यांचा जन्म.
१८९६ : कवी सुर्यकांत - त्रिपाठी उर्फ निशाला यांचा जन्म.
१८९७ : भारताचे प्रसिद्ध गायक दिलीप कुमार रॉय यांचा जन्म.
१८९९ : हिंदुस्तानी संगीतज्ज्ञ दिलीप कुमार रॉय यांचा जन्म.
१९०९ : यू. थांट - संयुक्त राष्ट्रांचे तिसरे सरचिटणीस (मृत्यू: १९७४)
१९११ : मराठी लेखक अनिरुद्ध घनश्याम रेळे यांचा जन्म.
१९१६ : हरिलाल उपाध्याय गुजराथी लेखक, कवी व ज्योतिषी (मृत्यू: १५ जानेवारी १९९४)
१९१६ : सत्येन बोस बंगाली व हिन्दी चित्रपट दिग्दर्शक व पटकथालेखक, चलती का नाम गाडी
१९२० : प्रा. ह. श्री. शेणोलीकर - संतसाहित्याचे अभ्यासक.
१९२२ : मराठी लेखिका शांता बुध्दिसागर यांचा जन्म.
१९३४ : विजय आनंद - हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (मृत्यू: २३ फेब्रुवारी २००४)
१९४९ : त्रिपुरा चे माजी मुख्यमंत्री माणिक सरकार यांचा जन्म.
१९५८ : दोस्ती १९६४, रात और दिन १९६७, आंसू बन गये फूल १९६९, जीवन मृत्यू १९७० हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. (मृत्यू: १९९३)
१९७३ : अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने गर्भपाताला मान्यता दिली, कोणतीही महिला गर्भवती असताना ६ महिन्यांपर्यंत गर्भपात करू शकते.
१९९६ : कॅलिफोर्निया च्या वेधशाळेतील शास्त्रज्ञांनी पृथ्वी पासून ३,५०,००० प्रकाश वर्ष इतक्या अंतरावर असलेल्या दोन नवीन ग्रहांचा शोध लावला.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९७ : योगी चांगदेव समाधिस्थ
१६६६ : ५ वा मुघल सम्राट शहाजहान याचे आपल्याच मुलाच्या (औरंगजेब) कैदेत १० वर्षे राहिल्यानंतर निधन (जन्म: ५ जानेवारी १५९२)
१६८२ : समर्थ रामदास स्वामी (जन्म: ६०८)
१७९९ : होरॅस बेनेडिट्ट डी सास्युरे - ऑस्ट्रियन उमराव, डॉक्टर आणि
१९०१ : व्हिक्टोरिया - इंग्लंडची राणी, हिने ६३ वर्षे आणि २१६ दिवस इंग्लंडवर राज्य केले. हिच्या कारकिर्दीत इंग्लंडच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नसे अशी ख्याती होती. व्हिक्टोरिया राणीच्या काळातच भारत इंग्लंडचा गुलाम झाला. (जन्म: २४ मे १८१९)
१९६७ : डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे - क्रांतिकारक, विद्वान, कृषीतज्ज्ञ, इतिहासकार आणि 'गदर पार्टी' चे शिल्पकार (जन्म: ७ नोव्हेंबर १८८४)
१९७२ : स्वामी रामानंद तीर्थ हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्य चळवळीचे नेते, समाजसुधारक आणि शिक्षण तज्ञ (जन्म: ३ आक्टोबर १९०३)
१९७३ : लिंडन बी. जॉन्सन - अमेरिकेचे ३६ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २७ ऑगस्ट १९०८)
१९७५ : 'काव्यविहारी' धोंडो वासुदेव गद्रे - केशवसुत संप्रदायी आधुनिक कवी (जन्म: १६ नोव्हेंबर १८९४)
१९७८ : हर्बर्ट सटक्लिफ - इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २४ नोव्हेंबर १८९४)
२००४ : भारतीय चित्रपट अभिनेत्री मेनका देवी यांचे निधन.

# बीड जिल्ह्यात ३४२३ पैकी ७२५ फळबागा बोगस

## बोगस फळबाग पीक विमा प्रकरणी चौकशी सुरू पण खरंच कारवाई होईल का?



बीड । प्रतिनिधी

राज्यातील मृग बहार २०२४ योजनेंतर्गत बोगस फळबाग पिक विमा प्रकरणात शासनाची दिशाभूल व आर्थिक फसवणूक करणाऱ्या बीड जिल्ह्यातील संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केल्यानंतर त्या निवेदनाच्या अनुषंगाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तहसीलदार महसूल -१ अविनाश शिंगटे यांनी महाराष्ट्र शासन गृह विभागाचे अपर मुख्य सचिव यांना संदर्भीय निवेदनाची प्रत उचित कार्यवाहीस्तव पाठवली असुन खरंच संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत की नेहमीप्रमाणेच हा सुद्धा चौकशीचा फार्स ठरणार आहे अशी शंका डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२४ व पुर्नरचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार २०२४ मधील विमा संरक्षित क्षेत्राची कृषी आयुक्तालयातील पथकांमार्फत क्षेत्रीय पडताळणी करण्याचे केंद्र शासनाने निर्देश दिले होते.त्या अनुषंगाने १६ ते १८ आक्टोबर २०२४ या कालावधीत बीडसह ईतर जिल्ह्यातील निवडक तालुक्यात विमा सहभागी शेतकऱ्यांच्या क्षेत्राची पडताळणी करण्यात आली होती.

या तपासणी पथकामध्ये कृषी उपसंचालक, तंत्र अधिकारी, कृषी अधिकारी व कृषी पर्यवेक्षक यांचा समावेश होता.पथकांमार्फत बीड, जालना,अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना व सांगली या जिल्ह्यांमध्ये तपासणी करण्यात आली होती.सदरील मोहिमेत एकुण ३६१ फळबागांची तपासणी करण्यात आली होती.या तपासणी मध्ये फक्त १४८ ठिकाणीच योग्य फळबागा आढळून आल्या होत्या.

पुनर्रचित हवामान आधारित फळ पिक विमा योजना मृगबहार सण २०२४ मध्ये विमा भरलेल्या बीड जिल्ह्यातील ३४२३ अर्जदारांच्या क्षेत्रावर जाऊन तपासणी केली जात आहे. तपासणी दरम्यान आतापर्यंत ७२५ ठिकाणी फळबागा नसणे, अधिकचे क्षेत्र दाखवणे, झाडे लहान असणे अशी प्रकरणे समोर आली आहेत.

ही सर्व बोगस प्रकरणे विमा कंपनीने रद्द करावी अशी सूचना जिल्हास्तरीय समितीने संबंधित विमा कंपन्यांना केली आहे. अद्याप ७०टक्के तपासणी झाली असून १०० तपासणी झालेली नाही. पुढील कालावधीत विमा काढलेल्या प्रत्येक ठिकाणी जाऊन तपासणी केली जाणार आहे सर्व तपासणी झाल्यानंतर हा अहवाल पुढे कृषी आयुक्तालयास पाठविण्यात येणार आहे . आष्टी तालुक्यातील केरूळ, कडा, धामणगाव, बिरंगुळवाडी या गावातील ४० ठिकाणी प्रतिनिधिक स्वरूपात फळबाग पीक तपासणी केली असता १८ योग्य अर्ज आढळले होते. ३ ठिकाणी फळपीक बाग आढळली नाही. प्रत्यक्षात लागवड क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र विमा घेतलेल्या अर्जांची संख्या १६ तर तपासणी वेळी शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या उत्पादनक्षम वयापेक्षा कमी वय आढळलेल्या अर्जांची संख्या ०३ आढळली होती.त्यानंतर जिल्हा तपासणी सुरू झाली.

## ज्युनियर साईन्टिस्ट स्पर्धा परीक्षा

### शैक्षणिक: निलज्योती सेवाभावी संस्थेचा उपक्रम



बीड । प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त निलज्योती सेवाभावी संस्थेतर्फे इयत्ता दुसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्युनियर साईन्टिस्ट ही स्पर्धा परीक्षा जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये संस्थेचे सचिव डॉ. नंदकुमार उघाडे यांनी आयोजित केली . ही परीक्षा सरस्वती विद्यामंदिर बीड , श्री माऊली इंग्लिश स्कूल सांडरवन , जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश स्कूल घाटजवळा ता. जि. बीड या शाळांमध्ये एकाच वेळी घेण्यात आली. या परीक्षेसाठी दुसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांचे तीन गट पाडण्यात आले होते. गट अ: दुसरी ते तिसरी, गट: ब चौथी ते पाचवी आणि गट क : सहावी ते सातवी . गट अ दुसरी व तिसरीसाठी विज्ञान विषयावर आधारित बहुपर्यायी ५० प्रश्नांची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना देण्यात आली तर, इयत्ता चौथी ते पाचवी आणि सहावी ते सातवी गटातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी १०० प्रश्नांची विज्ञान विषयावर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाची बहुपर्यायी प्रश्नपत्रिका देण्यात आली. ही परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सरस्वती विद्यामंदिर शाळेचे मुख्याध्यापक अंकुश गोरे , सहशिक्षक श्री. घोलप , सांडरवन येथील श्री माऊली इंग्लिश स्कूलमध्ये प्राचार्य विशाल मालखरे , सहशिक्षक प्रदीप शिंदे, संगीता पैठणे , रूपाली माळवदे , जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश स्कूल जवळा येथे प्राचार्य चंद्रकांत पोपळे , चंद्रशेखर साळवे , आकाश जाधव , ज्ञानेश्वर चव्हाण यांनी काम पाहिले. तिन्ही गटातून प्रथम द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात येणार आहे.

## || थोडक्यात



### सरस्वती विद्यामंदिरात स्वच्छता सप्ताह अंतर्गत स्वच्छता शपथ

बीड : सदृड आरोग्य व सब पढे सब बढे या शासनाच्या ऊपक्रमांतर्गत १९ जानेवारी ते २६ जानेवारी या स्वच्छता सप्ताह अंतर्गत सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड प्रशालेत आज स्वच्छतेची शपथ घेण्यात आली.प्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.गोरे सर यांनी विद्यार्थ्यांना सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेचे महत्व व स्वच्छता सप्ताह अंतर्गत राबविण्यात येणारे कृतीआराखडा कार्यक्रम चे नियोजण सादर केले. सदरील कार्यक्रमास सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### १३ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत ''जंत निर्मुलन पंधरवडा''

बीड: लाळखुरकुत लसीकरण फेरी-६ च्या प्रभावी अंमलबजावणी करिता दि.१३ जानेवारी ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत ''जंत निर्मुलन पंधरवडा'' साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लाळखुरकुत लसीकरण फेरी-६ च्या प्रभावी अंमलबजावणी करिता १३जानेवारी ते २७ जानेवारी या कालावधीत ''जंत निर्मुलन पंधरवडा'' साजरा करण्याचा कार्यक्रम सुरु आहे.

यामुळे पशुधनाचे जंतनिर्मुलन झाल्यास पशुधनामधील प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होणार असून जिल्ह्यातील सर्व पशुपालकांनी आपल्या गोवर्गीय व म्हैसवर्गीय पशूंना दिनांक १३ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत जंत निर्मुलन औषधी जवळच्याच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून पाजून घ्यावेत व तद्नंतर पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडून सूचना प्राप्त होताच आपल्या पशूंना लाळखुरकुत लसीकरण करून घ्यावेत, असे आवाहन पशुसंवर्धन उपआयुक्त जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी केले आहे.

## फातिमा शेख यांचे काल्पनिक पात्र म्हणणाऱ्या दिलीप मंडल हकलपट्टी करा-सज्जाद सय्यद

पाटोदा । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या खांद्याला खांदा लावून मुलींना शिक्षण देण्याचे काम त्यांचे सहकारी म्हणून शिक्षिका फातिमा शेख यांनी केले. तसेच उस्मान शेख यांनी०१ मे १८४९ रोजी पुणे येथे प्रौढ शिक्षणनाची स्थापना केली होती. त्यामध्ये सुद्धा माता सावित्रीबाई फुले यांनी अध्यापन कार्य केले. सावित्रीबाई फुले यांच्या मैत्रिण व सहकारी शिक्षिका फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्या अनुपस्थितीमध्ये शाळा सांभाळण्याचं काम केलं. उस्मान शेख व महात्मा फुले यांचे विचाराची मैत्री होती. आणि उस्मान शेख यांची बहीण शिक्षिका फातिमा शेख मुस्लिम समाजातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या.

त्यांच्या अनेक ग्रंथात माता सावित्रीबाई फुले व माता फातिमा शेख व शाळेतील मुली सह अनेक दुर्मिळ फोटो आजही उपलब्ध आहेत. अनेक ग्रंथात त्यांचा उल्लेख आहे. त्यांच्या या कार्यपद्धतीवर केंद्रीय माहिती प्रसारण सल्लागार दिलीप मंडल यांनी हे काल्पनिक पात्र आहे. असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे मुस्लिम, बहुजन समाजासह सत्यशोधक चळवळीला गालबोट लागत आहे. शिव-शाहु- फुले -आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये हे विधान खपवून घेतले जाणार नाही. या वक्तव्याचा आम्ही जाहीर निषेध करून दिलीप मंडल यांची हकालपट्टी करा. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सोसायटी संचालक - सज्जाद सय्यद, मानवाधिकारचे शेख इम्रान नूर मा. उपविभागीय अधिकारी यांच्या कडे निवेदन द्वारे करण्यात आली आहे



जालना : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार जालना दौऱ्यावर आले असता त्यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी भेट दिली त्यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे व शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी त्यांचा सत्कार केला.

## वाघोरा शाळेत आनंदनगरी



माजलगाव तालुक्यातील वाघोरा जि.प.शाळा केंद्र- राजेगाव या शाळेत दि.२० सोमवार रोजी सकाळी विद्यार्थ्यांना व्यवहारिक, आर्थिक व व्यावसायिक ज्ञान मिळावे यासाठी आनंदनगरीचे सांस्कृतिक विभाग प्रमुख- केशव बादाडे यांनी आयोजन केले होते.

आनंद नगरीचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अरुण बादाडे व उपाध्यक्ष गणेश बादाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक बादल डेंगळ,ज्येष्ठ शिक्षक राजेभाऊ आबुज, विनोद जाधव, बबन पोटे, तुलसीदास गुंडेकर, सतीश डोने हे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या आनंदनगरीमध्ये विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, चहा, शरबत, पोहे, वडापाव ,भेळ, गुलाबजाम,चिवडा, कचोरी, समोसे, आप्पे, भजे, इडली सांबर, बालुशाही विशेष करून खाद्यपदार्थ स्वतःच्या घरी तयार करून विक्रीसाठी आणले होते, काही विद्यार्थ्यांनी भाजीपाला, फळे, खेळणी घेऊन बसले होते सर्वात जास्त कमाई करण्यात एका विद्यार्थ्याने ७८० रुपये कमावले होते. त्याला नफा ३००रु. झाला. हजारो रुपयाची खरेदी विक्रीची उलाढाल झाली. यातून विद्यार्थ्यांनी किलो,लिटर ,कमी, जास्त ,मापन, गणन, पैशाची देवाणघेवाण, नफा तोटा, याचे ज्ञान मिळाले. खरेदीसाठी गावातील स्त्री-पुरुष, विद्यार्थी, शिक्षकांनी सहभाग घेतला होता.या आनंदनगरीतून सर्वांनी मनसोक्त आनंद घेतला.

## भगवा सप्ताहनिमित्त कार्यक्रमाची रेलचेल सुरु

बीड: सालाबादप्रमाणे याहीवर्षी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने भगवा सप्ताहाचा कार्यक्रम याही वर्षी मोठ्या उत्साहात सुरु असून त्यानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हा संघटक रतन गुजर आणि शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशाने व संपर्क नेते सुनिल प्रभु, उपनेत्या सुषमा अंधारे आणि संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर यांच्या नियोजनातून शिवसेनेचा भगवा सप्ताह सोमवार दि.२० जानेवारी पासून सुरु असून दि.२३ जानेवारी रोजीपर्यंत वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, खो-खो स्पर्धा, रनिंग स्पर्धा या भगवा सप्ताहामध्ये होणार असून दि.२३ जानेवारी रोजी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीच्या दिवशी या स्पर्धेचे बक्षीस वितरण संध्या.७ वाजण्याच्या सुमारास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहर प्रमुख, आजी-माजी पदाधिकारी, शिक्षकसेना व अंगीकृत सर्व संघटनांनी या ठिकाणी उपस्थित रहावे असे जिल्हा संघटक रतन गुजर आणि शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांनी पत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

## बीड नगर परिषदेला रूपाली देशपांडे यांनी दिल संक्रांतीचं अनोखं वाण

### शहर स्वच्छतेसाठी खराटे आणि टोपले भेट



बीड । प्रतिनिधी

शहर स्वच्छतेसाठी लेखिका रूपाली देशपांडे यांनी बीड नगर परिषदेला संक्रांतीची भेट म्हणून खराटे आणि टोपले वाण दिले. बीड नगर परिषद परिसरात याची जोरदार चर्चा होत आहे.

याविषयी बोलताना रूपाली देशपांडे म्हणाल्या की, सध्या बीड शहराची अवस्था ही अक्षरशः एखाद्या उकिरड्यासारखी झालेली आहे. संपूर्ण शहरात कुठेही जाऊन पाहिलं असता जिथे तिथे जागोजागी घाणच घाण, कचराच कचरा, गलिच्छता दिसून येत आहे. मग कोणा कोपरा असो की मुख्य रस्ते, सगळीकडे घाण आणि कचरा दिसत आहे. मोठे नाले असो की लहान नाल्या त्याही अगदी तुडुंब भरलेल्या दिसतात. चार-सहा महिन्यांतून लहान नाल्या साफ केल्यातर नालीतून काढलेली घाण आठ-आठ, दहा-दहा दिवस उचलली जात नाही. ती तशीच रस्त्यांवर पडून राहते. मोठे नाले तर वर्षानुवर्षे काढले जात नाही.

ही अवस्था पाहता बीड नगर परिषदेत स्वच्छता विभाग अस्तित्वात आहे की नाही? शहर स्वच्छतेसाठी आवश्यक संख्येत मनुष्यबळ आहे की नाही? स्वच्छते करिता लागणारी यंत्रसामग्री आहे की नाही? असे अनेक प्रश्न आम्हा बीड शहरवासीयांच्या मनात उत्पन्न होतात. बीड नगर परिषदेकडे मनुष्यबळ कमी असेल तर तो बीड शहराचे नागरिक म्हणून आम्ही वाढवू तर शकत नाही परंतु आमच्याकडून बीड नगर परिषदेला काही सामग्री देऊ शकतो. म्हणून सक्रांती सणाच्या निमित्ताने वाण म्हणून स्वच्छतेकरिता लागणारे खराटे आणि टोपले सप्रेम भेट म्हणून दिले आहे. प्रत्यक्षात मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांना भेटूनच द्यायचे होते. याकरिता गेल्या तीन दिवसांपासून त्यांच्याशी संपर्क साधून भेट देण्याचे सांगत होते परंतु मॅडमची भेट काही होऊ शकली नाही म्हणून खराटे आणि टोपले बीड नगर परिषदेतील त्यांच्या कार्यालयाच्या दारात ठेवले असे मनोगत रूपाली देशपांडे यांनी बोलताना व्यक्त केले.

## जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीसाठी उपलब्ध

बीड,: जिल्हा माहिती कार्यालय, बीड येथील वर्तमान पत्रांची रद्दी आहे त्या स्थितीत व स्वरूपात रद्दीची विक्री करावयाची आहे. ज्यांना रद्दी घ्यावयाची आहे. त्यांना कार्यालयीन वेळेत रद्दी पाहवयास मिळेल. तसेच रद्दी खरेदी करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी त्यांच्या लिफाफाबंद निविदा दरपत्रक प्रति किलोप्रमाणे मा. जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालयाच्या बाजुला, नगर रोड, बीड या पत्यावर दि. २८ जानेवारी २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत. रद्दी प्रत्यक्ष पाहून बंद लिफाफ्यात आपले आवश्यकतेनुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. रद्दी विक्रीचे दरपत्रक मंजूर करणे अथवा रद्द करणे, रद्दी विक्रीबाबतचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बीड यांचे असतील.२८ जानेवारी २०२५ तारखेनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**जाहिर प्रगटन**

**मा. श्री.व्ही.सी.जोशी सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १२०/२०२५**

**ॲड.एस.आर. उजगरे यांच्या मार्फत**

**सुनंदा नारायणराव जाधव वि. निरंक**

ज्यापेक्षा नारायण पि. रामचंद्र जाधव, हे दिनांक १८.०५.२०१७ रोजी माउली किटीकल सर्जीकल, बीड जि.बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार १) सुनंदाबाई भ्र.नारायणराव जाधव, वय-५३ वर्षे, धंदा : घरकाम रा. खंडेश्वरी रोड, हनुमान नगर. बीड ता.जि.बीड, २) लौकिक पि. नारायण जाधव वय-३९ वर्षे, धंदा मजुरी, रा.सदर., ३) रामचंद्र पि.नारायण जाधव वय-३६ वर्षे, धंदा मजुरी, रा. सदर, ४) ललित पि.नारायण जाधव वय-३५ वर्षे, धंदा मजुरी, रा. सदर.,५) लक्षदीप पि. नारायण जाधव वय-३३ वर्षे, धंदा मजुरी, रा सदर. अर्जदार क्र. १ ही मयत नामे नारायण पि. रामचंद्र जाधव, यांची पत्नी असून. अर्जदार क्र. २ ते ५ हे मयताचे मुले आहेत. मयतास मुलगी नाही. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे अमेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू हक्क नारायण पि. रामचंद्र जाधव, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २४/०२/२०२५ आहे.

आज दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व स्तर, बीड

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना गुंतवणूकदार जागरुकतेचे धडे

## विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेसाठी महाविद्यालयाने राबवला उपक्रम

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थी सुशिक्षीत होतात मात्र प्रत्येक विद्यार्थी आर्थिक साक्षर असेलच असे नाही. आर्थिक साक्षरता होणे काळाची अत्यंत गरज आहे. आपला पैसा कोठे आणि कसा गुंतवायचा, पैसे कसे कमवायचे. आलेल्या पैशाचे नियोजन कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थी दशेत मिळाले तर तो विद्यार्थी भविष्यात केव्हाच आर्थिक अडचणीत येवू नये यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयात भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) कडून एक दिवशीय गुंतवणूकदार



जागरूकता कार्यशाळा घेण्यात आली यावेळी सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे धडे दिले.

अलीकडे तरुण वर्गामध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव दिसून येतो. तरुणांचा काळ दिवसेंदिवस चैनी वस्तू, मौजमजा, बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे वळत चालला आहेत. तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची फसवणूक होते. यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे

> आदित्य शिक्षण संस्थेत आलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देताना आम्ही कोठेच कमी पडत नाहीत. पुस्तकी ज्ञान मिळवून आमचे विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात मोठं नाव कमावत आहेत. मात्र येथून बाहेर पडल्यानंतर ते आर्थिक साक्षर होऊन बाहेर पडतावेत. जिवन जगतांना त्यांना आर्थिक नियोजन करता यावे यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे देणारा उपक्रम राबवला.
>
> -संचालक डॉ. आदित्य सारडा

विद्यार्थी दशेमध्ये योग्य ते आर्थिक नियोजन केले तर भविष्यातील येणारे आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात. यासाठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसइ) चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला. आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले. तसेच कॅपिटल मार्केट काय असते?, म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे, एक्सचेंज ट्रेडेड फंड ईटीएफ, गव्हर्नमेंट बॉण्ड इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना सेबीची वेबसाईट व सेबी च्या सारथीचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना खबरदारी च्या सूचना दिल्या. आदित्य पॉलिटेक्निक बीड चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. आदित्य पॉलिटेक्निक कॉलेजचे विभागप्रमुख श्रीकांत शहाणे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. आभार तांबे यांनी मानले.

# अंबाजोगाईत कपड्याच्या दुकानाला आग; २५ लाखांचे नुकसान

## अग्निशामक दलाच्या बंबाने तीन तास पाणी मारून आग आटोक्यात आणली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील छत्रपती शिवाजीमहाराज चौकात असलेल्या नगर परिषदेच्या व्यापारी संकुलातील कपड्याच्या दुकानाला सोमवारी रात्री अचानक आग लागली.**

या आगीत दुकानातील रेडिमेड कपडे व फर्निचर जळून खाक झाले. या दुर्घटनेत अंदाजे २५ लाख रुपयांचे नुकसान झाले. सलग तीन तास अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी पाणी मारून आग विझविल्याने पुढील अनर्थ टळला.



येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गणेश प्रभाकर राऊत यांचे आविष्कार मेन्स वेअर हे रेडिमेड कपड्यांचे दुकान आहे. नेहमी प्रमाणे गणेश राऊत हे सोमवारी रात्री दुकान बंद करून घरी गेले. रात्री ११.३० वाजता त्यांच्या दुकानातून धुरांचे लोट निघू लागले. हे पाहून रात्रीची पेट्रोलिंग करणारे पोलिस व बाजूच्या चहाच्या टपरीवाल्याने त्यांना फोन वरून ही माहिती दिली. गणेश राऊत यांनी धावत येऊन अग्निशामक दलाला संपर्क केला. मात्र तो पर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. या आगीत दुकानातील रेडिमेड कपडे, फर्निचर जळून खाक झाले. ही आग इतकी मोठी होती की अग्नीशामक दलाच्या कर्मचाऱ्यांना आग आटोक्यात आणण्यासाठी तीन तास पाणी मारण्याचे काम करावे.लागले. या आगीत राऊत यांच्या दुकानातील माल जळून अंदाजे २५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेचा महसूल विभाग, व महावितरण यांच्या वतीने पंचनामा करण्यात आला आहे. मात्र ही आग नेमकी कोणत्या कारणाने लागली याचे रहस्य पोलीस तपासातूनच उलगडणार आहे.

### अर्ध्या रात्रीही अनेकजण मदतीसाठी धावले

छत्रपती शिवाजीमहाराज चौकात मध्यरात्री ही दुर्घटना घडली. याची माहिती तात्काळ सर्वत्र प्रसारित झाली. घटनास्थळी अनेकांनी धाव घेत मदतीचा हात दिला. सामाजिक कार्यकर्ते निलेश जगदाळे, कल्याण काळे धनराज सोळंकी,शकील शेख,स्वपिल परदेशी,संतोष मोहिते,प्रवीण चोकडा, गोपाळ परदेशी,पतंगे असे सर्वजण मिळून मदतीसाठी धावून गेले. आग आटोक्यात आणण्यासाठी या सामाजिक कार्यकर्त्यांची पहाटे पर्यंत धावपळ सुरुच होती. घटनास्थळी महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ वीज पुरवठा खंडित केला. यामुळे मोठी दुर्घटना टळली.




**बीड : पंचायत समिती बीड येथे प्रभारी गट विकास अधिकारी श्री प्रवीण वानखेडे यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सत्कार करताना जिल्हाध्यक्ष अजय सरवदे,किरण वाघमारे, सचिन मेघडंबर, भिमराव पायाल आदी उपस्थित होते.**

# अंबाजोगाईत २८ जानेवारीला जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

आंबेजोगाई । प्रतिनिधी

अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज, दक्षिण पीठ, नाणीज धाम, यांचा २८ जानेवारी रोजी, रामदेव बाबा मंदिर ट्रस्ट, संजय किशनराव भोसले (मुख्य प्रवर्तक) यांच्या शेतात आनंद नगर येथे, अंबाजोगाई शहरामध्ये भव्य पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन केलेले आहे.

जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या स्व-स्वरूप संप्रदायाच्या वतीने देशभरामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून समाज उपयोगी कार्य केले जाते यात संस्थांनच्या वतीने विनामूल्य ५४ ॲम्बुलन्स राष्ट्रीय महामार्गावर चालतात, गोरगरीब व गरजू मुलांना इंग्रजी माध्यमाचे एलकेजी ते बारावीपर्यंत शिक्षण मोफत दिलं जातं, हिंदू धर्मातून इतर धर्मात गेलेल्या लोकांना हिंदू धर्मात परत आणून त्यांचा रोटी बेटीचा व्यवहार संप्रदायामार्फत चालू करून दिला आहे, लाखो लोकांची व्यसनमुक्ती आजपर्यंत महाराजांनी केली आहे, आताच ४ जानेवारी ते १९ जानेवारी दरम्यान या पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये सांप्रदायाच्या माध्यमातून १ लाख ३६ हजार २७० रक्त कुपेकेच सांप्रदायाच्या मार्फत महाराष्ट्र शासनाला दान करण्यात आलं हा विश्व विक्रमच आहे, ७ अवयव दान या



संप्रदायाच्या माध्यमातून झालेले आहेत, त्याचबरोबर ७८ देहदान मेडिकल कॉलेजला आजपर्यंत सांप्रदायामार्फत सुफुर्द करण्यात आलेले आहेत, मागे महाड, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी येथे पूर परिस्थिती निर्माण झाली त्यावेळेला सांप्रदायामार्फत मदतीचा हात देण्यात आला त्यामध्ये धान्यवाटप असेल साफ सफाईचे कामे असतील हे सर्व सांप्रदायमार्फत केले गेले, असे अनेक विविध उपक्रम

◀◀ पान ३ वर

# प्रधानमंत्री आवास घरकूल योजनेचा लाभ घ्यावा -नगराध्यक्षा वंदनाताई जगताप

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी नगरपंचायत हद्दीमधील सर्व नागरिकांसाठी आनंदाची बाब म्हणजे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २ अंतर्गत नविन घरकूल मंजुरी करिता नोंदणी सुरु झालेली असून तरी इच्छूक लाभार्थ्यांनी वेब पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी तसेच त्या सर्व कागदपत्रांची एक प्रत नगरपंचायत कार्यालयामध्ये जमा करावी असे आवाहन वडवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप यांनी केले आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रधानमंत्री आवास योजनेमुळे गोरगरीब व सर्वसामान्यांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्णत्वास जात आहे. वडवणी शहरामध्ये प्रधानमंत्री आवास योजना आवास योजना टप्पा क्रमांक एकमुळे हजारो गोरगरिबांचे आपले स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण झालेले आहे. आता उर्वरित रहिवाशांना हे आपल्या स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करता येणार आहे. याकरिता प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २ अंतर्गत नविन घरकूल मंजुरी करिता वेब पोर्टलवर इच्छूक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी. यासाठी आवश्यक पात्रता यामध्ये भारतामध्ये लाभार्थी तसेच कुटुंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे, लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही घरकूल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, कुटुंबातील वार्षिक उत्पन्न मर्यादा ३ लक्ष रुपये कमाल राहील. अशी यासाठी पात्रता असून नविन घरकूल नोंदणी ऑनलाईन करण्याकरिता खालील प्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत. यामध्ये विहित नमुन्यातील ऑनलाईन भरलेला अर्ज, अर्जदाराचे मोबाईल नंबर लिंक असलेले आधार कार्ड, तहसीलदार यांचेकडील चालू वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड, आधार लिंक असलेले बँकेचे पासबुक, पी.टी.आर रजिस्ट्री सातबारा हे जमिनीचे पुरावे, अर्जदार यांचे आई वडिलांचे आधार कार्ड तसेच जर ते हयात नसतील



◀◀ पान ३ वर

# नवीन शैक्षणिक धोरणाचा युवकांनी अंगीकार करून प्रसार करावा -डॉ.प्रा.वंदन



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मोजे बांगरवाडी येथे विशेष शिबिर आयोजन करण्यात आले या बौद्धिक सतरा अध्यक्षपदावरून डॉक्टर जाधव मी बोलत होते सध्याच्या शैक्षणिक मगात नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रसार करणे गरजेचे आहे नवीन शिक्षणा शैक्षणिक धोरणामुळे अमुलाग्र बदल होणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा अंगीकार करून त्याचा प्रसार करावा असे आव्हान डॉक्टर वंदन जाधव यांनी केले या कार्यक्रमाची प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक विनोद यांनीही आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी आपल्या मनोगत आहात नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून युवकांना नवीन संधी उपलब्ध होणार आहेत विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास होणार आहे त्यामुळे या धोरणाचा विद्यार्थी पालक शिक्षक यांनी अंगीकार करावा असे आवाहन केले या कार्यक्रमाचे गावातील नागरिक महादेव काळे पोपटराव काळे दत्ता काळे शाळेचे मुख्याध्यापक पोलीस स्टेशन श्राव घुमरे मॅडम उपस्थित होत्या या कार्यक्रमाचे संचालन विशाल काळे तर उपस्थित मान्यवरांचे आभार कार्यक्रमाधिकारी डॉक्टर शिवाजी

◀◀ पान ३ वर

### पाटोदा नगर पंचायत उपाध्यक्षपदी रोहिदास गित्ते

पाटोदा । प्रतिनिधी

आमदार सुरेश आण्णा धस यांच्या सूचनेनुसार पाटोदा नगरपंचायत च्या उपनगराध्यक्षपदी श्री रोहिदास गीते, स्वीकृत नगरसेवक पदी श्री संजय शिंदे व सौ रूपाली संदीप जावळे निवड करण्यात आली आहे . याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा नगरपंचायत मध्ये दि.२० रोजी नुतन पदाधिकारी निवडीसाठी विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या सूचनेनुसार पाटोदा नगरपंचायत च्या उपनगराध्यक्षपदी श्री रोहिदास गीते, स्वीकृत नगरसेवक पदी श्री संजय शिंदे व सौ रूपाली संदीप जावळे निवड करण्यात आली आहे.


# ट्रकच्या भीषण अपघातात दोघे जागीच ठार

म्हसोबावाडी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील गहुखेल येथील नवानाथ दहिफळे यांचा मुलगा गणेश दहिफळे व किन्नर नितिन राठोड बोधेगाव हे दोघे खडकपुर(ओडीसा)येथे दि.१९ रोजी नगर कांदा मार्केट येथून ट्रक मध्ये कांदा घेऊन जात असताना सुमारे पहाटे झालेल्या भिषण अपघातात हे दोघे ही जागीच ठार झाले गणेश दहिफळे वय अंदाजे ३२ वर्षे असुन हे आष्टी तालुक्यातील गहुखेल गावचे चालक मालक असुन त्यांच्या पाश्चात्य त्यांचे दोन मुले



व पत्नी जनाबाई दहिफळे आहेत व नितिन राठोड वय अंदाजे १८ वर्षे रा.बोधेगाव ता.शेवगाव त्यांच्या पाश्चात आई-वडील



तासा परिवार आहे या घटनेमुळे गहुखेल व पंचक्रोशीतील लोकांतून हळहळ व्यक्त होत आहे.

# मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्काराचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख व खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते २७ जानेवारीला होणार वितरण

## आ.प्रकाश सोळंके, ओमप्रकाश शेटे,बाबुराव पोटभरे,भाई मोहन गुंड,भागवत तावरे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने दि २७ जानेवारी सोमवार रोजी होणाऱ्या मूकनायक आणि माजलगाव भूषण पुरस्कार सन्मान सोहळ्याला शेतकरी कामगार पक्षाचे माजी मंत्री स्व लोकनेते गणपतराव देशमुख यांचे नातु पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार



आ.भाई डॉ.बाबासाहेब देशमुख



मा.खा.बजरंगबप्पा सोनवणे



मा.आ.प्रकाशदादा सोळंके



मा.ओमप्रकाश शेटे



मा.बाबुराव पोटभरे



मा.भाई मोहन गुंड



मा.भागवत तावरे

असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड लोकसभेचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची उपस्थिती लाभणार आहे,अशी माहिती संयोजक ज्योतिराम पांढरपोटे यांनी दिली.

माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळा,सोमवार दि २७ जानेवारी २०२५ रोजी शहरातील मॉ.वैष्णवी मंगल कार्यालयात सकाळी ११:०० वाजता रंगणार आहे. मुकनायक पुरस्कारासाठी दै राज्य लोकतंत्रचे बीड/पुणे येथील संपादक गणेश मोकाशे,व सा.घोंगडीचे संपादक बंडु खांडेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे.तर माजलगाव भुषण पुरस्कार माजी नगरसेवक तालेब चाऊस (सामाजिक कार्य),श्री सिद्धेश्वर अर्बनचे चेअरमन सुनील रुद्रवार (सहकार), न्युट्रीजॅग गुळ उद्योगाचे

◀◀ पान ३ वर

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून स्वयंपूर्णता व श्रमसंस्कार रुजतात-पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे

किल्लेधारूर - प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबिर सन २०२४-२५ मौजे अंजनडोह येथे दिनांक २१ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत युथ फॉर माय भारत आणि युथ फॉर डिजिटल लिटरसी ही थीम घेऊन आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. देविदास वाघमोडे यांच्या हस्ते झाला. या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या स्वयंसेवकांनी विद्यापीठाने शिबिरासाठी दिलेल्या थीमच्या अनुषंगाने अंजनडोह गावामध्ये ग्रामस्थांमध्ये, जनतेमध्ये माय भारत संकल्पना व डिजिटल लिटरसी या संकल्पना लोकांना पर्यंत पोहोचवाव्यात. शिबिराच्या माध्यमातून स्वच्छतेसंबंधिचा संदेश गावातील शेवटच्या घटकापर्यंत द्यावा. स्वयंपूर्णता अंगीकृत येण्यासाठी शिबिरे स्वयंसेवकांवर संस्कारांचे धडे देत असतात. आपल्या हातून गावाची सेवा घडावी व ग्रामस्थांना चांगला संदेश जावा असा संदेश दिला. महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे यांनी अध्यक्षीय समारोपातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा

◀◀ पान ३ वर



# जानपीर विद्यालयाचे शासकीय ग्रेड चित्रकला स्पर्धेत अभूतपूर्व यश

पाटोदा । प्रतिनिधी

जानपीर माध्यमिक विद्यालय नाळवंडी, कारेगाव ता पाटोदा जि बीड या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शासकीय इंटरमिजिएट व इलिमेंटरी परीक्षेत ३७ विद्यार्थ्यांना यश संपादन केले त्यामध्ये इंटरमिजिएट इलिमेंटरी परीक्षेत यशस्वी विद्यार्थी खालील प्रमाणे

इंटरमिजिएट परीक्षा- एकूण १९ विद्यार्थी पास १)माहीन मुजीब सय्यद ( ग्रेड), समर्थ शरद येवले ( ग्रेड),

◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ठाकरे सेनेचा स्वबळाचा नारा! पिंपरीतील शिवसैनिकांची मात्र वेगळी भूमिका; शिवसैनिकांची पुणे-पिंपरीत आघाडीचे संकेत?



पुणे । प्रतिनिधी

शिवसेना उद्धव ठाकरेंची शिवसेना आगामी महापालिका स्वबळावर लढणार, अशी घोषणा खासदार संजय राऊतांनी केली आहे. पिंपरी-चिंचवडच्या शिवसैनिकांची मात्र वेगळी भूमिका आहे. राज्यात स्वबळावर लढले तरी पिंपरीत मात्र महाविकासआघाडी कायम ठेवा, असा आग्रह संपर्क प्रमुख सचिन अहिरांकडे पिंपरीच्या शिवसैनिकांनी केली आहे. महायुती स्वबळावर लढली आणि महाविकास आघाडी एकत्र लढली तर ताकद वाढेल. त्यामुळं पुणे, पिंपरी चिंचवड पालिका निवडणुकीत महाविकास आघाडी दिसू शकते. ही शक्यता नाकारता येत नाही. असे संकेत देताना सर्वस्वी निर्णय पक्षप्रमुख उद्धव ठाकरे घेतील असं ही अहिरांनी नमूद केलं आहे.

बोलताना सचिन अहिर म्हणाले, दोन मतप्रवाह आहेत, महाविकास आघाडीकडून लढावं तर महाविकास आघाडीचे नेते पुढे सोबत राहतील का नाही, माहिती नाही, असा संभ्रम निर्माण झालेला आहे, म्हणून पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्या उपस्थितीमध्ये एका बैठकीचे आम्ही नियोजन केलेलं आहे. आमचं जरी वेगळं मत असले तरीदेखील अंतिम निर्णय हा शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरेंचा असेल. २३ तारखेला आपली भूमिका जी राज्यव्यापी असेल ती जाहीर करतील, असेही पुढे त्यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना सचिन अहिर म्हणाले, याबाबत एक गोष्ट नक्की आहे. या आधी देखील जेव्हा जेव्हा आघाडी धर्म म्हणून जिल्हास्तरीय आपण निर्णय घ्यायचो, त्या-त्या ताकतीने त्या-त्या प्रवाहाने आपण काम करायचो, पुणे पिंपरी चिंचवड यांच्यासह काही भागांमध्ये आघाडी केली तर आपली आणखी ताकद वाढू शकते. समोर आघाडी होणार नसेल तर त्याचा फायदा मोठ्या प्रमाणावर आपल्याला मिळू शकतो. शक्यता नाकारता येणार नाही पण, एक गोष्ट नक्की आहे. पक्ष म्हणून जेव्हा भूमिका घेत असतात. एका बाजूला तुम्ही आघाडी करता आणि दुसऱ्या बाजूला विरोध करता असा संभ्रम देखील लोकांच्या मनामध्ये निर्माण होऊ शकतो. त्यामुळे काही शहरांना लागून आहेत त्यामध्ये ठाणे कल्याण ठिकाणी पक्ष स्वबळावरती लढण्याचा निर्णय घेऊ शकतो. पुणे, पिंपरी, चिंचवड या ठिकाणी स्वबळावर लढायचं की आघाडी करायची याबाबत संयुक्त निर्णय आपल्याला या दोन्ही महानगरपालिकेच्या बाबतीत घ्यावा लागेल. उद्या आम्ही पिंपरी चिंचवडला वेगळी भूमिका घेतली आणि पुण्याला आम्ही एकत्रित राहण्याचा निर्णय घेतला तर तिकडे विसंगती येईल, कारण तिकडे दोन्ही शहरांना लागून आहेत, या सर्व गोष्टींची चर्चा निश्चितपणे केले जाईल असेही पुढे ते म्हणालेत.

पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांवर ती बोलताना सचिन अहिर म्हणाले, जे लोक काही नसताना पक्षाकडे विश्वासाने येतात. त्यांना पक्ष मोठ्या विश्वासाने जबाबदारी देतो. काही महिन्यातच त्यांना उमेदवारी देखील जाहीर होते आणि त्यांनी पक्ष सोडल्यानंतर नेत्यांवरती गंभीर आरोप करायचे हे दुर्दैवी आहे. मला असं वाटतं यांना जास्त महत्त्व देण्याची गरज नाही. जय-पराजय हा वेगळा भाग असतो. नेत्यांवर आरोप करण्यात काहीच अर्थ नाही, गेल्या काही काळात ते मला भेटले होते. मात्र त्यांनी याबाबत माझ्याशी कोणती चर्चा केली नाही अर्थात त्यांना जाण्यासाठी रस्ता मोकळा आहे आणि मार्ग आहेत, त्यांनी ते स्वीकारावे मात्र त्यांनी नेत्यांवर आरोप करून ठपका ठेवून आरोप करण्याचं काम केलं असेल तर ते दुर्दैवी आहे. पक्षालाही विचार करावा लागेल अशा नेत्यांना अशा कार्यकर्त्यांना जेव्हा आपण पक्षात घेत होतो, तेव्हा नेते जबाबदारी देतो आणि अशा प्रकारे वागणाऱ्यांना कशी जबाबदारी द्यावी असा प्रश्न निर्माण होतो असेही ते पुढे म्हणालेत.

# स्वारगेटला 'मल्टीमॉडेल ट्रान्सपोर्ट हब' उभारण्याची घोषणा; प्रवाशांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार

पुणेः सध्या पुण्यातील वाहतूक कोंडी एक मोठी समस्या बनलेली आहे. शहातील अनेक भागात वाहतूक कोंडी होत आहे. प्रशासनाकडून वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अनेक उपायोजना देखील करण्यात येत आहेत. स्वारगेट चौकातील वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त आहेत. चौकातून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी प्रवाशांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. आता स्वारगेट येथे मल्टीमॉडेल ट्रान्सपोर्ट हब उभारण्यात येणार असल्याची महत्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार स्वारगेट बस स्थानक आणि मेट्रो स्टेशन एकमेकांना जोडण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव पुणे मेट्रोने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला द्यावा, अशा सूचना परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिल्या.

पुणे शहरातील मेट्रो प्रकल्पांच्या सध्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी पुणे मेट्रोच्या शिवाजीनगर येथील कार्यालयात आढावा बैठक पार पडली. पुणे मेट्रोच्या सर्व अधिकाऱ्यांसोबत सद्यस्थितीत सुरू असणारी कामे तसेच पुर्णत्वास आलेली कामे तसेच प्रलंबित मार्गांचा आढावा यावेळी राज्यमंत्री मिसाळ यांनी घेतला. शहरातील खडकवासला-खराडी मेट्रो मार्ग आणि एस.एन.डी.टी ते माणिकबाग मेट्रो जोडमार्ग हे दोन्ही प्रकल्प सध्या केंद्र सरकारडे प्रस्तावित आहेत. तर वनाज ते चांदणी चौक मेट्रो मार्ग तसेच रामवाडी ते विठ्ठलवाडी हे दोन मार्ग अंतिम मंजुरीसाठी राज्य कॅबिनेटकडे प्रस्तावित केले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

धनकवडी, बालाजीनगर मेट्रो स्टेशन

यानंतर लगेचच कात्रज ते स्वारगेट मेट्रो मार्गाचे काम सुरू करण्यात येणार असून, यामुळे शहरातील



वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. याच मार्गावर धनकवडी आणि बालाजीनगर मेट्रो स्थानक होण्यासाठी देखील प्रयत्न सुरू आहेत. शिवाय शिवाजीनगर मेट्रो स्टेशन येथे देखील शिवाजीनगर एसटी स्थानक मेट्रोसोबत समन्वय ठेवून एकत्रितरीत्या नियोजन करून निर्माण केले जाईल, असे मिसाळ यांनी सांगितले.

राज्यातील एसटी बसेसची संख्या वाढवण्यार भर

पुढील आठवड्यात पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत एकत्रित बैठक होणार आहे. त्यामध्ये या गोष्टींवर निर्णय घेतला जाईल. राज्यात एसटी बसची संख्या वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. शहरातील नागरिकांना वाहतुकीस मदत व्हावी, यासाठी परिवहन विभागांतर्गत पुणे शहरातील रिक्षा स्टँड, बस स्टँड किती आहेत, याचा आढावा घेऊन रोडमॅप करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

# पुण्यात गुलेन बॅरी सिंड्रोमचे २२ संशयित रुग्ण

पुणे: पुण्यात गुलेन बॅरी सिंड्रोमचे २२ संशयित रुग्ण सापडले असल्याची माहिती आहे. आय सी एम आर एन आय व्हीला तपासणीसाठी नमुने पाठवले आहेत. गुलेन बॅरी सिंड्रोम विरोधात महापालिका क्शन मोडमध्ये आली आहे. एनआयव्हीचा रिपोर्ट आल्यानंतर ज्या भागात हे रुग्ण आढळले आहेत, त्या भागात टीम दाखल करणार आहे. हा एक न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर आहे, जो



एक लाखांमध्ये एका व्यक्तीला आढळतो.

वेगळ्या पद्धतीच्या वॅक्सिन्स घेतल्या असेल किंवा एच वन एन वनच्या वॅक्सिंग घेतल्या असेल तर काही प्रमाणात हा दुर्मिळ आजार लोकांना होऊ शकतो. याचे निदान करण्यासाठी स्पाइनल फ्लूडची चाचणी केली जाते. उपाय म्हणून प्लाज्मा एक्सचेंज सारखे उपचार केले जातात. हा आजार दुर्मिळ असला तरीही धोकादायक नाही, अशी माहिती आहे.

पुणे शहरातील ६ आणि बाकी रुग्ण हे पुणे जिल्ह्यातील आहेत. आरोग्य प्रमुख नीना बोराडे यांनी यासंबंधीची माहिती दिली आहे. रुग्ण उपचारासाठी पुण्यात आलेले होते, पुण्याच्या बाहेरील हे रुग्ण आहेत अशी माहिती आहे. हा आजार संसर्गजन्य नाही. या रुग्णांची तपासणी केली जात आहे. ज्या हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावरती उपचार सुरू होते, त्या परिसरातही रुग्णांची तपासणी केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

# ज्येष्ठ किर्तनकार किसन महाराजांना अखेरचा निरोप; संत-साहित्याच्या आठवणींना उजाळा, गहिवरले भक्तगण



पुणे । प्रतिनिधी

संत साहित्याचे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायातील जेष्ठ कीर्तनकार किसन महाराज साखरे यांचे निधन झाले. डॉ. किसन महाराज साखरे यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास घेतला. प्रकृती बिघडल्याने महाराज साखरे यांना दोन दिवसांपूर्वी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांना हृदयविकाराचा झटका आला अन् त्यांतच त्यांची प्रणज्योत मालवल्याच माहिती निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे. दरम्यान, आज मोठ्या गर्दीत त्यांच्यावर आळंदी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. किसन महाराज यांचे थोरले सुपुत्र यशोधन साखरे यांनी साखरे महाराजांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. यावेळी, त्यांचा भक्त परिवार आणि अनुयायी वर्ग शोकाकूल झाला होता.

किसन महाराज साखरे यांनी क्षेत्र आळंदीच्या ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त म्हणून त्यांनी काम पाहिलेले होते. तसेच आळंदी, देहू परिसर विकास समितीच्या सुकाणू समितीचे अध्यक्षपद देखील त्यांनी भूषवले. याशिवाय ग्रंथराज ज्ञानेश्वरीची दृकश्राव्य प्रत त्यांनी प्रकाशित केली असून त्यांची ११५ पेक्षा अधिक पुस्तक प्रकाशित झाली आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीवर १४ वर्षे विश्वस्त म्हणून त्यांनी काम पाहिले

महाराजांच्या निधनाचे वृत्त समजताच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी भाविकांनी व अनुयायांनी आळंदीत मोठी गर्दी केली होती. आळंदीतून प्रदक्षिणा मार्गाने वैकुंठवासी किसन महाराज साखरे यांच्या पार्थिवाची काढण्यात आली, या अंत्ययात्रेला शोकाकूल वातावरण मोठा जनसागर दिसून आला. आळंदीतील साधकाश्रम येथे त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला. दरम्यान, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त योगी निरंजनाथ यांच्यासह अनेक महाराज व भक्तगणांनी साखरे महाराजांच्या आठवणींना उजाळा दिला.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून श्रद्धांजली

**संत साहित्याचे गाढे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायाचा वसा जपणारे ज्येष्ठ कीर्तनकार डॉ.किसन महाराज साखरे यांच्या दुःखद निधनाने वारकरी संप्रदायाचा वारसा चालविणाऱ्या आध्यात्मिक परंपरेची मोठी हानी झाली आहे. साखरे महाराजांनी संस्कृत आणि मराठी भाषेतून ११५ ग्रंथ लिहून साहित्यविश्वात मोलाची भर घातली आहे. सार्थ ज्ञानेश्वरी, सार्थ एकनाथी भागवत, सार्थ तुकाराम महाराज गाथा, सार्थ भगवद्गीता, सार्थ ब्रह्मसूत्र, सार्थ उपनिषद, सोहम योग, ज्ञानेश्वर महाराज चरित्र आदी ग्रंथसंपदेतून त्यांनी संत साहित्य सामान्यांपर्यंत पोहोचविले. ५०० ताम्रपटांवर ज्ञानेश्वरी प्रकाशित करून आपल्या अभिजात परंपरेला वैभवान्वित केले. त्यांच्या थोर कार्यास विनम्र अभिवादन. या पुण्यात्म्यास सद्गती प्राप्त व्हावी ही ईश्वरचरणी प्रार्थना, अशी श्रद्धांजली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाहिली.**

# हिंदू गर्जना चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा लोगोचे पुनीत बालन यांच्या हस्ते अनावरण



पुणे: हिंदू गर्जना प्रतिष्ठान युथ असोसिएशन व पुनीत बालन ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'हिंदू गर्जना चषक महिला व पुरुष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा २०२५'चा आखाडा येत्या दि. ७ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत रंगणार आहे. या कुस्ती स्पर्धेच्या लोगोचे अनावरण युवा उद्योजक पुनीत बालन यांच्या हस्ते करण्यात आले.

शिक्षण प्रसारक मंडळीच्या सहकार्याने आणि पुणे जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेच्या लोगोच्या अनावर प्रसंगी बोलताना पुनीत बालन म्हणाले की, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नेहमीच पुनीत बालन ग्रुप पुढाकार घेतो. हिंदू गर्जना चषक या निमित्ताने मातीतल्या खेळाशी कुस्तीची अधिक जवळून जोडले जाता येईल याचा आनंद आहे. तसेच या स्पर्धेत आम्ही एकूण ४२ लाखांची भरघोस बक्षीसे देणार असून प्रथम क्रमांकास थार भेट देण्यात येणार आहे. भाजपचे शहराध्यक्ष व हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे अध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे म्हणाले, महाराष्ट्र केसरीच्या तोडीस तोड ही स्पर्धा आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या स्पर्धेसाठी खेळाडू, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ही स्पर्धा दि. ७, ८ व ९ फेब्रुवारी २०२५ रोजी एसपी कॉलेज महाविद्यालय टिळक रोड पुणे येथे भरवण्यात येणार आहे.

# छत्रपती शिवाजीनगर मतदारसंघातील पाणीपुरवठ्यात सप्टेंबरपर्यंत वाढ - आमदार सिद्धार्थ शिरोळे

पुणे - मोठ्या क्षमतेच्या टाक्या बांधण्याचे काम ऑगस्ट महिन्यापर्यंत पूर्ण होईल. त्या नंतर सप्टेंबर महिन्यापासून छत्रपती शिवाजीनगर मतदारसंघातील सर्व भागांना पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होऊ शकेल आणि पाण्याची समस्या सुटेल, असे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी सांगितले.

मतदारसंघातील पाणीपुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी त्यांनी आज अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर प्रसारमाध्यमांना माहिती देताना आमदार शिरोळे यांनी सांगितले की, गेले दोन वर्षे यासंदर्भातील विकास कामांचा



पाठपुरावा केल्यानंतर, आता त्याला चांगले स्वरुप येऊ लागले आहे.

पाणीपुरवठ्याच्या अकरा झोन पैकी दहा झोनमधील कामे येत्या ऑगस्टपर्यंत पूर्ण होणार आहेत. विशेषतः सात ठिकाणी पाणी पुरवठ्यासाठी मोठ्या क्षमतेच्या टाक्या बांधण्यात येत असल्याने पाणी पुरवठ्याचा दाब वाढणार आहे. येत्या ऑगस्टपर्यंत टाकी बांधण्याचे, तसेच काही ठिकाणी नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याचा फायदा शिवाजीनगर मतदारसंघातील सर्वच भागातील नागरिकांना होणार आहे. हा मतदारसंघ पर्वती जलकेंद्रापासून लांब असल्याने, येथे पाणीपुरवठ्याची समस्या भेडसावते.आमदार झाल्यापासून ही समस्या सोडविण्यासाठी मी कार्यरत आहे. येत्या ऑगस्टपर्यंत साठवण टाक्या बांधण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यालगतच्या सर्व परिसरात पुरेशा दाबाने व्यवस्थित पाणीपुरवठा सुरू होईल. असे आमदार शिरोळे यांनी सांगितले.

# कामे करण्यासाठी पैसे मागाल तर ग्रामविकास मंत्र्यांचा कारवाईचा इशारा; पुण्यातील आढावा बैठकीनंतर माध्यमांशी संवाद

पुणे । प्रतिनिधी

पुणे विभागाच्या ग्रामविकास विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यशाळा आणि आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीनंतर राज्याचे



ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. नागरिकांची कामे करून घेण्यासाठी कर्मचारी व अधिकाऱ्यांनी पैशांची मागणी केल्यास त्यांच्यावर ॲक्शन घेऊन कारवाई करण्याचा इशारा दिला.

तसेच भ्रष्टाचाराला पायबंद घालण्यासाठी कार्यालयाबाहेर माझा मोबाईल क्रमांक लिहिण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या आहेत. ज्यांना घरे नाहीत आणि जमिनी नाहीत अशा नागरिकांसाठी घरकुल योजना राबविली जात आहे. घरकूल योजना मंजूर करण्यासाठी, घरकूलचा हप्ता देण्यासाठी कर्मचारी, अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे पैसे देण्याची गरज नाही. त्यातही कोणी कर्मचारी पैसे मागत असेल तर त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

कर्मचारी अधिकारी यांची सेवा, आस्थापनाविषयक आणि नागरिकांची कामे जिल्हा परिषदेच्या पातळीवर होणार असतील तर त्यासाठी अनेकजण मंत्रालयात जातात. त्यांनी त्या कामांसाठी मंत्रालयात जाऊ नये, त्यांची कामे जिल्हा पातळीवरच पूर्ण करावीत, अशा सूचना देखील त्यांनी यावेळी बोलताना केल्या आहेत. पंचायत समिती, जिल्हा परिषदेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती पेन्शन मिळण्यात कोणतीही अडचण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## सरपंचासोबत ग्रामसेवकावरही कारवाई

**राज्यातील अनेक ग्रामपंचायतीमध्ये कामे करुन घेण्यासाठी भ्रष्टचार होत असून याबाबतच्या अनेक तक्रारी येतात. त्या तक्रारीवरून सरपंचावर कारवाई केली जाते. मात्र, सरपंचासोबत ग्रामसेवकही दोषी असतो. कारण ते दोघेही मिळून स्वाक्षरी करत असतात. यामुळे सरपंचासोबतच ग्रामसेवकावरही कारवाई केली जाणार असल्याचा इशारा गोरे यांनी दिला.**

# संत एकनाथांचे कार्य समाजापुढे नव्याने यावे : ह.भ.प. पुष्कर महाराज गोसावी

भामचंद्र, चाकण - संत एकनाथ महाराजांचे कार्य प्रत्येक काळात, प्रत्येक पिढीत मार्गदर्शन करणारे आहे. ते सामाजिक एकोपा जपणारे आहे. संत एकनाथांचे कार्य समाजापुढे नव्याने यावे. त्यांच्या या कार्याला 'ज्ञानबातुकाराम' या वार्षिकाच्या संत एकनाथ महाराज विशेषांकाने उजाळा दिला आहे, असे प्रतिपादन संत एकनाथ महाराजांचे १४वे वंशज डॉ. पुष्कर महाराज गोसावी यांनी रविवारी (दि. १९) येथे व्यक्त केले.

'ज्ञानबातुकाराम' या वार्षिक अंकाच्या संत एकनाथ महाराज विशेषांकाचे प्रकाशन डॉ. गोसावी यांच्या हस्ते भामचंद्र डोंगर पायथा येथे झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्राच्या लोक व्यवहाराचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, संत एकनाथ महाराज यांचे वशंज हभप पुष्कर महाराज गोसावी, देहू संस्थानचे विश्वस्त हभप माणिक महाराज मोरे, भारूडकार चंदाताई तिवाडी, संत साहित्याचे अभ्यासक




अभय टिळक, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार भास्कर हांडे, न्यूज १८ लोकमतचे संपादक मंदार फणसे, ज्ञानबा तुकारामच्या संपादक डॉ. दीपा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ अवसक तसेच भामचंद्र डोंगर सप्ताह समितीचे सदस्य आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सदानंद मोरे म्हणाले, संत एकनाथ महाराजांनी आपल्या बंधुभावाच्या विचारांनी समाज जोडला. याच विचारांची सध्या समाजाला गरज आहे. कारण आपण जाती-जातींच्या नावाखाली एकमेकांच्या विरोधात उभे राहिलेलो आहोत.

संत साहित्याचे अभ्यासक अभय टिळक म्हणाले, कुठल्याही विचारांना बहुजन समाजाने पाठिंबा दिल्याशिवाय तो विचार दृढ होत नाही. हेच ओळखून संत एकनाथ महाराजांनी आपला समाज प्रबोधनाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविला. शूद्रातिशूद्रांना, स्त्रियांना अधिकार देण्याचे कार्य संत ज्ञानदेवांनी केले. हेच कार्य संत एकनाथांनी पुढे नेले. या संत विचारांची सध्याच्या काळात गरज आहे. संत एकनाथ महाराज विशेष अंकाने ही गरज पूर्ण केली आहे.

भामचंद्र डोंगर सप्ताह कमिटीतर्फे मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. प्रस्ताविक डॉ. श्रीरंग गायकवाड यांनी केले तर आभार उद्धव धुमाळे यांनी मानले.

अजान वृक्षाची लागवड -

यावेळी आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी जवळील अजान वृक्ष, तसेच वटवृक्षाची लागवड प्रमुख पाहुणे, मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. 'आई नाना' प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये ज्येष्ठ भारूडकार चंदाताई तिवाडी आणि सहकाऱ्यांनी विविध अभंग रचना सादर केल्या.

# साहित्य संमेलनासाठी पुण्यातून विशेष रेल्वे गाडी; साहित्य प्रेमींची दीड हजारात दिल्लीवारी

पुणे । प्रतिनिधी

फ्रेब्रुवारी महिन्यात राजधानी दिल्लीत तब्बल सात दशकांनी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. इतक्या वर्षांनी हे साहित्य समंलेन दिल्लीत होत असल्याने यास विशेष महत्व आहे. यामुळेच साहित्य रसिकांसाठी दिल्लीवारी करण्यासाठी भारतीय रेल्वे पुणे विभागाने दिल्लीसाठी विशेष रेल्वे गाडीचे आयोजन केले आहे. दीड हजार रुपये भरून साहित्य रसिकांना या विशेष रेल्वे गाडीने दिल्लीला जाता येणार आहे. या तिकीट दरामध्ये कोणतीही सवलत मिळणार नाही.

नुकतीच पुण्यातून प्रयागराजसाठी महाकुंभ मेळाच्या पार्श्वभूमीवर विशेष रेल्वे गाडी सोडण्यात आली होती. जवळपास जानेवारी महिन्याच्या १५ तारेखेला सुरू झालेला महाकुंभ मेळा महिन्याभर चालणार असल्याने मोठ्या प्रमाणावर भक्त रेल्वेने प्रयागराजमध्ये जात आहे. दिल्लीत होणाऱ्या साहित्य संमेलनासाठी विशेष रेल्वे गाडी सोडावी, अशी मागणी सरहत संस्थेने केली होती. यासाठी केंद्रीय राज्यमंत्री आणि संमेलनाचे सरकार्यवाह मुरलीधर मोहाळ यांच्या प्रयत्नामुळे रेल्वे मंत्रालयाने महाकुंभ आणि इतर अडचणी असतानाही ही रेल्वे सेवा मंजूर केली आहे.

रक्कम मात्र तीनपट

रेल्वे मंत्रालयाने सवलत न देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला असल्याने दिल्लीला येणाऱ्या साहित्य रसिकांची अडचण होऊ नये यासाठी दीड हजार भरून प्रवासी नोंदणी करू शकणार आहेत. ही विशेष रेल्वे गाडी स्लीपर क्लास असणार आहे. १९ फ्रेब्रुवारी या दिवशी पुण्यातून दिल्लीच्या दिशेने ही रेल्वे प्रस्थान ठेवणार आहे. २० फ्रेब्रुवारीला ही रेल्वे दिल्लीत पोहचेल. २३ फेब्रुवारीच्या रात्री परतीचा प्रवास सुरू होऊन २४ फेब्रुवारीला पुण्यात पोहचेल. ही विशेष रेल्वे असल्याने त्यासाठी भरावी लागणारी रक्कम सामान्य तिकिटीच्या तीनपट आहे.